# <u>वार्षिक सर्वसाधारण सभा</u>

आर्थिक वर्ष 2017 – 18 (इतिवृत्त)

दिनांक 11 ऑगष्ट 2018

फळसेवाडी हितकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक 11 ऑगष्ट 2018 रोजी सायंकाळी 6:00 वाजता सोशल सर्विस लीग शाळा, दामोदर हॉल जवळ, परेल, मुंबई येथे घेण्यात आली.

सभेस उपस्थित सभासदांची / ग्रामस्थांची नावे खाली दिली आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री पांडुरंग सावजी राणे – सभाध्यक्ष | 2. श्री सुनिल सदानंद राणे – सचिव |
| 3. श्री उदय भगवान राणे – खजिनदार | 4. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 5. श्री आनंद नारायण साटम | 6. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 7. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे | 8. श्री दिलीप मधुकर राणे |
| 9. श्री भरत गणपत राणे | 10. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 11. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 12. श्री उत्तम वामन राणे |
| 13. श्री संकेत रत्नाकर राणे – स्थानिक सदस्य | 14. श्री भास्कर दौलत राणे |
| 15. श्री सत्यविजय शिवराम राणे | 16. श्री रविंन्द्र भगवान राणे |
| 17. श्री सुनिल विनायक राणे | 18. श्री संतोष मधुसूदन राणे |
| 19. श्री लक्ष्मण शिवाजी राणे | 20. श्री दशरथ दत्ताराम साटम |
| 21. श्री सुरेश रघुनाथ राणे | 22. श्री अशोक दत्ताराम राणे |

सचिवांनी फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे उपस्थितांचे स्वागत करुन उपस्थितांस अवगत केले की संस्थेतर्फे एकूण 109 सभासदांना / ग्रामस्थांना वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस पाठविण्यात आलेली होती त्यापैकी 6 ग्रामस्थांना पाठविलेल्या नोटीसा वितरीत न होता परत आल्या. नोटीस न पोहोचलेल्या सभासदांना / ग्रामस्थांना सभेची माहीती मिळावी या उध्देशाने त्यांस SMS पाठवून आज असलेल्या सभेसंबधी माहीती दिली गेलेली आहे.

सचिवानी त्यानंतर उपस्थितांस सांगितले की आज सर्वसाधारण सभेस एकूण 22 सभासद / ग्रामस्थ उपस्थित असून कार्यकारीणीवरील स्थानिक सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे गावाहून सभेस उपस्थित राहण्यासाठी आले आहेत.

सचिवांनी पुढे उपस्थितांस माहीती दिली की संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्यावर त्यांचे कामाचे ठिकाणी आजच जबाबदारीचे काम आकस्मितरित्या आल्यामुळे सभेस उशीरा उपस्थित राहीन असे प्रथमत: सांगितले होते. आता नुकताच त्यांचा फोन आला असून जबाबदारीच्या कामात पुर्न:तहा अडकून पडल्यामुळे निघता येत नसल्यामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकणार नाही असे त्यांनी कळविले आहे.

सचिवांनी त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्या अनुपस्थितीत आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी श्री पांडूरंग सावजी राणे यांची नियुक्ती करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला असता सचिवांनी मांडलेल्या या प्रस्तावास सर्व उपस्थितांनी मंजूरी दिली.

श्री पांडूरंग सावजी राणे यांनी सभाध्यक्षस्थान स्विकारुन उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सचिवांना वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरु करण्याची सूचना केली.

सचिवांनी प्रथमत: आर्थिक वर्षात दिवंगत झालेल्या ग्रामस्थांस आणि देशाच्या संरक्षणासाठी शहीद झालेल्या सैनिक / पोलीस जवान यांस श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना केली. उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत ग्रामस्थांस आणि शहीद सैनिक / पोलीस जवान यांस श्रध्दांजली वाहिली.

सचिवांनी त्यांनतर उपस्थितांसमोर आजच्या सभेच्या विषयपटलावरील विषयांचे वाचन करुन सभेस सुरवात केली.

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की सर्वासाठी संस्थेतर्फे एक आनंदाची बातमी असून फळसेवाडी हितकारी संस्थेने हाती घेतलेले स्वयंपूर्ण नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा या प्रकल्पाचा एक महत्वाचा टप्पा पूर्ण झालेला असून कालपासून म्हणजेच दिनांक 10 ऑगष्ट 2018 पासून वाडीवर स्वयंपूर्ण नळयोजनेमार्फत पाणीपुरवठा सुरु झालेला आहे. हा संपूर्ण प्रकल्प मार्गी लावण्याची जबाबदारी स्थानिक कार्यकारीणी सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे यांचेवर सोपविण्यात आली होती आणि त्यांनी ती यशस्वीरित्या पार पाडली आहे.  आजच्या सभेस श्री संकेत रत्नाकर राणे उपस्थित असल्यामुळे सचिवांनी त्यांस स्वयंपूर्ण नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा प्रकल्पासबंधी माहीती उपस्थितांना देण्याची विनंती केली.

श्री संकेत रत्नाकर राणे यांनी उपस्थितांना खालील सविस्तर माहीती दिली –

| दिनांक | करण्यात आलेल्या कामाचा तपशील |
|---|---|
| 25-05-2018 | पाण्याच्या टाकीच्या स्ट्रक्चरचे बांधकाम सुरु करण्यात आले. |
| 08-06-2018 | पाण्याच्या टाकीच्या स्ट्रक्चरचा पाया तयार करण्यात आला. |
| 28-06-2018 | पाण्याच्या टाकीच्या स्ट्रक्चरचा शेवटचा स्लॅब ओतून झाला व स्ट्रक्चर संपूर्णरित्या तयार झाले. |
| 19-07-2018 | श्री लिंगेश्वर,  श्री ब्राम्हणदेव आणि श्री येडदोबा महाराज या देवतांना श्रीफळ देऊन पाईपलाईन टाकण्यासाठी चरी मारण्याचे काम सुरु करण्यात आले. या प्रसंगी स्थानिक ग्रामस्थ सर्वश्री अरुण वासुदेव राणे, रत्नाकर नाना राणे, आप्पा वसंत राणे आणि चार लमानी कामगार उपस्थित होते. |
| 21-07-2018 | साटमांची विहीर ते पाण्याची टाकी या पहिल्या चरीचे काम पुर्ण करण्यात आले. |
| 22-07-2018 | दुसऱ्या चरीचे म्हणजेच पाण्याची टाकी ते जुनी पाईपलाईन पर्यंतचे काम हाती घेऊन ते दिनांक 23-07-2018 रोजी पूर्ण करण्यात आले. |
| 25-07-2018 | तिसऱ्या चरीचे म्हणजे पाण्याची टाकी ते बाम्हण विहीरीपर्यंत काम हाती घेण्यात आले. हे अंतर जास्त असल्यामुळे आणि ही चरी जंगलातून जात असल्यामुळे नैसर्गिक अडचणी म्हणजेच झाडांची मोठीमोठी मुळे, पाण्याचे वहाळ यांच्या मधून ही खोदावी लागली त्यामुळे ही चरी पूर्ण करण्यासाठी सर्वात जास्त म्हणजे 5 दिवासांचा कालावधी लागला. |
| 02-08-2018 | मुंबईहुन पाठविण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या मुक्कामी पोहचल्या, कामावर उपस्थित असलेल्याम लमाण्यामार्फत टाक्या ताबडतोब स्ट्रक्चरपर्यंत नेण्यात आल्या. |
| 03-08-2018 | श्री ब्राम्हणदेवाच्या मंदिरात श्रीफळ ठेवून पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यास सुरवात केली. याप्रसंगी सर्वश्री तुकाराम विनायक राणे, प्रकाश हरिश्चंद्र राणे, अरुण वासुदेव राणे, साबाजी विठोबा साटम व पाईप लाईन टाकणारे कामगार उपस्थित होते. |

| | |
|---|---|
| 04-08-2018 | प्रथमत: ब्राह्मण विहीरीमध्ये पंप सोडण्यात आला. |
| 05-08-2018 | ब्राह्मण विहीर ते पाण्याची टाकी ही पाईपलाईन पूर्ण करण्यात आली. याच दिवशी पाण्याच्या टाक्या फार मोठी कसरत करुन स्ट्रक्चरवर चढविण्यात आल्या. |
| 08-08-2018 | दुसरा पंप साटमांच्या विहीरीमध्ये सोडण्यात आला व ही पाईपलाईन पूर्ण करण्यात आली. |
| 09-08-2018<br><br>10-08-2018 | टाकीपासून जुन्या पाईपलाईनला नवीन पाईपलाईन जोडण्यात आली व पाईपलाईनचे परीक्षण करण्यासाठी पाण्याच्या टाक्या साटमांच्या विहीरीत लावलेल्या पंपाने भरण्यात आल्या.<br>आणि संपूर्ण वाडीवर प्रायोजिक तत्वावर पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. |

उपस्थितांनी पाणीपुरवठा घरोघरी सुरु झाला हे ऐकून आनंद व्यक्त केला आणि काम मार्गी लावल्याबद्दल कार्यकारीणीचे अभिनंदन केले. या कामी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी संस्थेच्या मागे आर्थिक पाठबळ उभे केले त्याबद्दल त्यांचेही आभार मानण्यात आले.

सचिवांनी त्यांनतर विषयपटलावरील विषयांस सुरवात केली.

विषय क्रमांक 1 आणि 2

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की  मागील आर्थिक वर्षांमध्ये दोन सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या. त्यापैकी एक विषेश सर्वसाधारण सभा दिनांक 15 एप्रिल 2017 रोजी मुंबई येथे आणि दुसरी सर्वसाधारण सभा दिनांक 27 ऑगष्ट 2017 रोजी गणपती उत्सवादरम्याण गावी घेण्यात आली. या सभांची इतिवृत्ते त्या त्या सभेस असलेल्या उपस्थितांस पाठविण्यात येऊन त्यांचेकडून इतिवृत्तांवर अभिप्राय मागविण्यात आले होते. सभांस उपस्थित राहीलेल्या सभासद / ग्रामस्थांकडून या इतिवृत्तांमध्ये सुचविलेले योग्य बदल विचारात घेऊन इतिवृत्तांमध्ये सुधारणा करण्यात आली असून ही सुधारीत इतिवृत्ते आजच्या सभेच्या नोटीशीसमवेत सर्वांना पाठविण्यात आलेली आहेत. त्यांनतर सचिवांनी इतिवृत्ते मंजूर करण्यात यावीत असा ठराव मांडला.

उपस्थितांनी दिनांक 15 एप्रिल 2017 आणि दिनांक 27 ऑगष्ट 2017 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभांच्या इतिवृत्तास मंजूरी दिली.

विषय क्रमांक 3

सचिवांनी सांगितले की आर्थिक वर्ष 2017 – 18 मधील झालेल्या सर्वसाधारण सभांमध्ये मंजूर झालेल्या प्रस्तावांनुसार करण्यात आलेल्या कामांची तसेच संस्थेने गेल्या वर्षभरात केलेल्या वाटचालाची माहीती सभासदांस / ग्रामस्थांस वार्षिक अहवालाच्या माध्यमातून पोहचविलेली आहे. वार्षिक अहवालामध्ये नमुद केल्यानुसार संस्थेने गेल्या वर्षभरात केलेल्या प्रगतीची नोंद उपस्थितांनी घ्यावी व त्यासंबधी काही सूचना करावयाच्या असल्यास सभाग्रहापुढे मांडाव्यात अशी विनंती सचिवांनी केली.

उपस्थितांनी आर्थिक वर्ष 2017 – 18 मध्ये संस्थेने केलेल्या कामांची तसेच संस्था करत असलेल्या प्रयत्नांची नोंद घेऊन समाधान व्यक्त केले आणि संस्थेच्या प्रयत्नास सुयश चिंतीले.

विषय क्रमांक 4
सचिवांनी माहिती दिली की दिनांक 31 मार्च 2018 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची हिशेबपत्रके शासकीय लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षित करुन घेण्यात आली आहेत. लेखापरिक्षित केलेली हिशेबपत्रके सभागृहापुढे मांडून हिशेबपत्रकांवर चर्चा करावयाची सूचना सचिवांनी उपस्थितांस केली. उपस्थितांकडून हिशेबपत्रकांवर प्रश्न उपस्थित न केल्यामुळे, सचिवांनी आर्थिक वर्ष 2017 – 18 ची हिशेबपत्रके मंजूरीचा ठराव सभागृहापुढे मांडला.

उपस्थितांनी आर्थिक वर्ष 2017 – 18 ची हिशेबपत्रके मंजूर केली.

विषय क्रमांक 5(1)
सचिवांनी माहिती दिली की पिसेकामते गावाचे ग्रामदैवत श्री लिंगेश्वर मंदीराच्या जिर्णोध्दाराचे काम पिसेकामते विकास मंडळाने हाती घेतले आहे. निधी उभारणीसाठी त्यांनी खांब / पायरी पुरस्कृत करण्याची संधी ग्रामस्थांस उपलब्ध करुन दिली आहे. या संधीचा लाभ घेऊन फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे खांब पुरस्कृत करावा यासंबधीचा प्रस्ताव सचिवांनी वाचून दाखविला.

वरील प्रस्तावावर चर्चा झाली असता उपस्थितांमधून श्री दिलीप मधुकर राणे आणि श्री भास्कर दौलत राणे यांनी यापूर्वी देवस्थानातील वहिवाटदारांतर्फे / मानकऱ्यांतर्फे फळसेवाडीतील ग्रामस्थांच्या मुख्यतो माहेरवाशीणींच्या बाबतीत करण्यात आलेल्या दुजाभाव आणि ग्रामस्थांशी झालेल्या वर्तनुकीसंबधी विचारणा केली.

याविषयावर चर्चा झाली असता सचिवांनी सांगितले की मागील प्रकरणाची चर्चा पिसेकामते विकास मंडळ तसेच देवालाय समिती यांच्याशी करण्यात आली असून त्यांस स्पष्टरित्या सांगण्यात आले आहे की श्री लिंगेश्वर देवालय कोणा एका समाजाचे नसून संपूर्ण गावाचा (फळसेवाडीचाही) त्यावर हक्क आहे. ग्रामदैवतेचा आर्शिवाद / कृपादृष्टी सर्वांस लाभावयास हवी. देवालयाची वरसल ज्या मानकऱ्याची असेल त्यांने वैयक्तिक हेवेदावे बाजुला सारुन देवापुढे नतमस्तक होणाऱ्या  सर्व भाविकांचे काम करणे आद्य कर्तव्य मानावयास हवे. पिसेकामते विकास मंडळ आणि देवस्थान समिती कडून याबाबतीत सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे आपण ही बाब पुन्हा पुन्हा न उगाळता या विषयावर पडदा टाकावा आणि ग्रामदैवतेच्या देवालयाच्या जिर्णोध्दारासाठी फळसेवाडीच्या हिश्याचा काही भार उचलाविण्याची तयारी दाखववी.

सचिवांनी पुढे सांगितले की फळसेवाडी हितकारी संस्थेकडून एखादा खांब पुरस्कृत केल्यास पुढील काही दशके श्री लिंगेश्वर देवालयाच्या जिर्णोध्दारासाठी फळसेवाडीतर्फे करण्यात आलेले योगदान समस्त गावकऱ्यांच्या निर्दशनास येत राहील. फळसेवाडीने मागिल विषय विसरुन केलेले योगदान समस्त गामस्थांस कळणे फार महत्वाचे आहे.

सचिवांनी मांडलेल्या विचारावर सर्वांचे एकमत होऊन फळसेवाडीतर्फे श्री लिंगेश्वर देवालयाचा एक खांब पुरस्कृत करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. जमा होणाऱ्या रक्कमेनुसार खांब पुरस्कृत करण्याचे अधिकार फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणीकडे सोपविण्याचा प्रस्तावासही उपस्थितांतर्फे मंजूरी देण्यात आली.

खांब पुरस्कृत करण्यासाठी प्रत्येक विभक्त कुटुंबाने लवकरात लवकर कमीतकमी रु.500/- इतकी देणगी फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणी सदस्यांकडे सोपवावी ही विनंती सचिवांनी उपस्थितांस केली असता श्री भास्कर दौलत राणे यांनी त्यांचेतर्फे रु.2,000/- देणगी ते देऊ इच्छितात असे सभागृहापुढे सांगितले. श्री भास्कर दौलत राणे यांनी

केलेल्या देणगीच्या घोषणेची सभागृहाने नोंद घेतली व त्यांच्या विभागात कार्यरत असलेल्या कार्यकारीणी सदस्यांने त्यांचेकडून देणगीची रक्कम जमा करुन घ्यावी अशी सूचना केली.

विषय क्रमांक 5(2)
सचिवांनी विषय क्रमांक 5(2) अर्तंगत तलाठी कार्यालयाकडून सात-बारा उतारा मिळवून देणे, जमीन मोजणीसंबधी पुर्वतयारी करुन घेणे याबाबतची कामे संस्थेच्या माध्यमातून करुन देण्यासंबधी प्रस्तावाचे वाचन उपस्थितांपुढे केले. सचिवांनी उपस्थितांस जाणीव करुन दिली की आपल्या जमीनीच्या कागदपत्रांवरील नोंदीव्यतिरिक्त ती प्रत्यक्षात कोठे आहे ही माहीती ग्रामस्थांस (पुढील पिढीस) असणे आवश्यक आहे. आपली जमीन प्रत्यक्षात कोठे आहे ही माहीती फक्त जमीन मोजणीच्या वेळी संबधीतांना कळू शकेल. मुंबईस्थित ग्रामस्थांना त्यांची नोकरी / व्यवसाय सांभाळून जमीन मोजणीच्या कामाची जुळवाजुळव करणे शक्य होत नसल्यामुळे फळसेवाडी हितकारी संस्था याबाबत मार्गदर्शन आणि सहाय्य करु इच्छिते.

याबाबत झालेल्या चर्चेमध्ये श्री सत्यविजय शिवराम राणे आणि श्री भरत गणपत राणे यांनी भाग घेऊन जमीनीचे ठिकाण पुढील पिढीस कळणे ही बाब अत्यंत आवश्यक आहे असे मत मांडले. त्यांनी सांगितले की संस्था याबाबत पुढाकार घेत असेल तर ते त्यांच्या कुंटुंबियांच्या जमीनीची मोजणी करुन घेण्यास इच्छूक आहेत.

श्री सत्यविजय शिवराम राणे यांनी सूचना केली प्रत्येक तुकड्याची (गट क्रमांकाची) मोजणी करण्यास अंदाजे किती खर्च येईल यासंबधी माहीती गोळाकरुन इच्छूकांना उपलब्ध करुन द्यावी जेणेकरून जमीन मोजणीबाबत ग्रामस्थांस निर्णय घेता येईल. इतर उपस्थितांनीही याबाबत सकारात्मक मत प्रदर्शित करून सविस्तर माहीती संकेत स्थळावर टाकण्यात यावी अशी सूचना केली.

विषय क्रमांक 5(3) आणि 5(4)
विषय क्रमांक 5(3) - संस्थेच्या माध्यमातून वनीकरण योजना राबविणे आणि विषय क्रमांक 5(4) - पडीक जमीनीवर सामुहिक शेती करणे हे विषय चर्चेकरीता सचिवांनी मांडले असता उपस्थितांकडून सूचना करण्यात आली की या विषयांवर होणाऱ्या चर्चेवेळी स्थानिक ग्रामस्थांची उपस्थिती असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे आज या विषयांवर चर्चा करुन हे विषय पुन्हा स्थानिकांसमोर चर्चेस आणण्याऐवजी पुढील महिन्याभरात गणपती उत्सवादरम्याण जेव्हा मुंबईतील ग्रामस्थ गावी उपस्थित असतील त्यावेळी होणाऱ्या सभेत हे विषय चर्चेस आणावेत जेणेकरून या महत्वाच्या विषयांवर साधकबाधक / सखोल चर्चा होऊ शकेल.

सचिवांनी विषय क्रमांक 5(3) आणि विषय क्रमांक 5(4) हे दोन्ही विषय गणपती उत्सवादरम्यान गावी घेण्यात येणाऱ्या सभेपुढे चर्चेस आणण्याचे मान्य केले.

विषय क्रमांक 6
मागील सभांमधे कार्यकारीणी सदस्यांमध्ये लोकशाही मार्गाने बदल घडवून आणण्याचा विचार मांडण्यात आला होता याची जाणीव सचिवांनी उपस्थितांस करुन दिली. या विचारानुसार आजच्या सर्वसाधारण सभेपुढे कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक असणाऱ्या ग्रामस्थांची नोंद घेऊन त्यांची कार्यकारीणीवर निवड करण्यासंबधी हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे असे सचिवांनी सांगितले.

याविषयासंबधी चर्चेत भाग घेतांना श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस माहिती दिली की वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या कार्यकारीणीच्या सभांस कार्यकारीणी सदस्यांव्यतिरिक्त काही ग्रामस्थास संस्था आमंत्रित करीत असते. आमंत्रित ग्रामस्थांपैकी श्री सुनिल विनायक राणे आणि श्री गुरुनाथ गणपत राणे हे बहुतांशी सभांस उपस्थित राहतात. तसेचे हे दोन्ही ग्रामस्थ संस्थेच्या कार्यात सक्रिय आहेत. कार्यकारीणीस अशा सक्रिय सहकाऱ्यांची आवश्यकता असल्यामुळे श्री सुनिल विनायक राणे आणि श्री गुरुनाथ गणपत राणे यांच्या नावाचा कार्यकारीणी सदस्य म्हणून विचार करण्यात यावा असे श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सुचविले.

श्री सुनिल विनायक राणे आणि श्री गुरुनाथ गणपत राणे यांची नावे श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी कार्यकारीणी सदस्य म्हणून सुचविली असता या दोन्ही नावांस श्री पांडूरंग सावजी राणे यांनी अनुमोदन दिले. या दोन्ही ग्रामस्थांव्यतीरिक्त उपस्थितांतर्फे कोणी इच्छूक पुढे न आल्यामुळे श्री सुनिल विनायक राणे आणि श्री गुरुनाथ गणपत राणे यांची कार्यकारीणीवर सर्वानुमते निवड करण्यात आली.

सचिवांनी नवनिर्वाचित कार्यकारीणी सदस्यांचे अभिनंदन करून उपस्थितांस सांगितले की आज निवडण्यात आलेल्या नवीन दोन कार्यकारीणी सदस्य विचारात घेता कार्यकारीणी सदस्यांची संख्या 18 झालेली असून प्रस्तावात मांडल्यानुसार पुढील चार वर्षात कार्यकारीणी सदस्यांची संख्या कमी करुन 12 सदस्यांपर्यतच मर्यादित करण्याचा विचार आहे. या प्रस्तावास अनुसरुन पुढील वर्षांमध्ये निवृत्त होणाऱ्या कार्यकारीणी सदस्यांची नावे कार्यकारीणीच्या सभेत सल्लामसलत करुन ठरविण्यात येतील, उपस्थितांनी सचिवांनी मांडलेल्या प्रस्तावास मंजूरी दिली.

<u>ताजा कलम</u> : दिनांक 02 सप्टेंबर 2018 रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या सभेत कार्यकारीणी सदस्याची संख्या पुढील चार वर्षाऐवजी पुढील सहा वर्षात मर्यादित (12 सदस्य) करावी का ? याबाबत चर्चा करण्यात आली. चार ऐवजी पुढील सहा वर्षात कार्यकारीणीची संख्या मर्यादित करण्याचे मुख्य कारण म्हणजे नवीन पदाधिकाऱ्यांनी कार्यभार स्विकारण्यापूर्वी त्यांना कमीतकमी दोन वर्षे तरी विद्यमान पदाधिकाऱ्यासोबत काम करावयाची संधी मिळावी हे होते.

कार्यकारीणीच्या दिनांक 02 सप्टेंबर 2018 रोजीच्या सभेमध्ये ठरविण्यात आल्यानुसार पुढील सहा वर्षांमध्ये खालील कार्यकारीणी सदस्य निवृत्त होतील. निवृत्त होणारे कार्यकारीणी सदस्य त्या त्या वर्षी उपलब्ध असणाऱ्या जागांवर फेरनिवडीस पात्र राहतील. आर्थिक वर्ष 2024 – 25 पासून कार्यकारीणी सदस्य संख्या 12 सदस्य इतकीच मर्यादित ठेवण्यात येईल.

| **वर्ष** | **निवृत्त होणार्य कार्यकारीणी सदस्यांची** | | **नविन निवड होणारे सदस्य** | **कार्यकारीणीची संख्या** |
|---|---|---|---|---|
| | **संख्या** | **नावे** | | |
| 2019 – 20 | 2 | श्री जयवंत नाना राणे<br>श्री उत्तम वामन राणे | 1 | 17 |
| 2020 – 21 | 2 | श्री पांडूरंग सावजी राणे<br>श्री अशोक दत्ताराम राणे | 1 | 16 |
| 2021 – 22 | 3 | श्री उदय भगवान राणे<br>श्री शंकर बाळकृष्ण राणे<br>श्री भरत गणपत राणे | 2 | 15 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2022 – 23 | 4 | श्री मंगेश मनोहर राणे<br>श्री दशरथ दत्ताराम साटम<br>श्री रंजन रावजी म्हसकर<br>श्री रामदास मारुती राणे | 3 | 14 |
| 2023 – 24 | 4 | श्री सुनिल सदानंद राणे<br>श्री दिलीप मधुकर राणे<br>श्री हेमंतकुमार रमेश राणे<br>सौ अनुजा अरुण राणे | 3 | 13 |
| 2024 – 25 | 3 | श्री गुरुनाथ गणपत राणे<br>श्री सुनिल विनायक राणे<br>श्री संकेत रत्नाकर राणे | 2 | 12 |

**आर्थिक वर्ष 2024 – 25 नंतर प्रत्येक वर्षी दोन कार्यकारीणी सदस्य निवृत्त होतील आणि तेवढेच नविन कार्यकारीणी सदस्य निवडले जातील. आर्थिक वर्ष 2024 – 25 नंतर निवड झालेल्या प्रत्येक कार्यकारीणी सदस्याचा कार्यकाल 6 वर्षांचा राहील.**

विषय क्रमांक 7

सचिवांनी उपस्थितास सांगितले की दरवर्षी संस्थेची एक सर्वसाधारण सभा मुंबईत आणि एक गावी घेण्याचे ठरविण्यात आले आहे त्यानुसार यावर्षी गावी घेण्यात येणाऱ्या सभेची तारीख गणपती उत्सवादरम्याण 14 सप्टेंबर 2018 ही ठेवावी का ? याबाबत विचार करण्यात यावा.

उपस्थितांनी स्थानिक ग्रामस्थांस विचारात घेऊन सभेची तारीख नक्की करण्यात यावी अशी सूचना केली.

विषय क्रमांक 8

आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी अर्तंगत लेखापरिक्षकाची नेमणूक या संदर्भात सचिवांनी उपस्थितांस सांगितले की सध्या संस्थेने बरीच कामे हाती घेतली आहेत. सभासदांकडून येणे असलेली बऱ्याच वर्षांच्या थकबाकीची वसुली तसेच विविध कामांसाठी फंड उभारणी इत्यादी महत्वाच्या आर्थिक बाबींवरही काम सुरु आहे. त्यामुळे हिशेबपत्रके शासकीय लेखापरीक्षकापुढे लेखा परिक्षित करण्यास देण्यापूर्वी कार्यकारीणीव्यतिरीक्त एखाद्या त्रयस्त ग्रामस्थाकडून ज्यास हिशेबपत्रके तपासण्याची माहीती असेल त्याच्या नजरेखालून हिशेबपत्रके स्वतंत्ररित्या जाणे आवश्यक आहे.

यासंबधी चर्चा करण्यात आली असता श्री महेश भास्कर राणे (98337 27979) यांचे नाव श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी सुचविले. उपस्थितांनी श्री महेश भास्कर राणे यांच्या नावास मंजूरी दिली त्यानंतर सचिवांनी श्री महेश भास्कर राणे यांना पुढील आर्थिक वर्षासाठी 'अंर्तगत हिशेब तपासणीस' नेमल्याचे जाहीर केले.

श्री भास्कर दौलत राणे यांनी सुचविले की श्री महेश भास्कर राणे आजच्या सभेस उपस्थित नसल्याकारणे त्यांची परस्पर नेमणूक करण्याऐवजी कार्यकारीणीने त्यांच्याशी संपर्क साधून याबाबतीत त्यांची मंजूरी मिळविणे आवश्यक आहे. श्री भास्कर दौलत राणे यांनी केलेल्या सूचनेची कार्यकारीणीने नोंद घेतली.

ताजा कलम : श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी श्री महेश भास्कर राणे यांच्याशी संपर्क साधून त्यांस संस्थेचा अंर्तगत हिशेब तपासणीस ही जबाबदारी स्विकारण्याची विनंती केली असता त्यांनी आनंदाने संस्थेच्या कार्यात सहभागी होण्यास संम्मती दिली.

विषय क्रमांक 9
आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी शासकिय लेखा परिक्षकाची नेमणूक करण्यासंबधी सचिवांनी माहीती दिली की आर्थिक वर्ष 2017 – 18 ची हिशेबपत्रके M/s NBT & Associates या चार्टर्ड अकाऊन्टन्ट फर्म कडून लेखा परिक्षित करुन घेण्यात आली आहेत. या फर्मचे प्रवर्तक श्री दशरथ दत्ताराम साटम यांच्या परिचयातील असून उपस्थितांची मान्यता मिळाल्यास या फर्मला आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी लेखा परिक्षक म्हणून नेमता येईल. परंतू ही फर्म मोठी असल्यामुळे यदा कदाचित या फर्मने आपल्या संस्थेचे छोटेसे काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास दुसऱ्या कोणालातरी विचारणा करावयास लागेल.

सचिवांनी प्रस्ताव मांडला की आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी M/s NBT & Associate आणि हि फर्म उपलब्ध नसल्यास दुसऱ्या चार्टर्ड अकाउटन्ट फर्मला शासकिय लेखा परिक्षक म्हणून नेमणूक करावयाचे अधिकार कार्यकारीणीस द्यावेत.

उपस्थितांनी सचिवांनी मांडलेल्या प्रस्तावास मंजूरी दिली.

विषय क्रमांक 10
सचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने इतर कोणांस काही विषय सभेपुढे मांडावयाचे आहेत का ? अशी विचारणा केली असता संस्थेचे खजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी विषय मांडला की सभासद नोंदणी अभियानादरम्याण काही सभासद सांगतात की त्यांनी काही वर्षांपूर्वी संस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे ते संस्थेची थकबाकी भरु इच्छित नाहीत तर अशा बाबतीत काय करावयाचे याबाबत मार्गदर्शन व्हावे.

श्री उदय भगवान राणे यांनी मांडलेल्या प्रश्नावर संस्थेचे कार्याध्यक्ष श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला की –

1. फळसेवाडी हितकारी संस्था ही फळसेवाडीतील ग्रामस्थांच्या हितासाठीच कार्यरत आहे.

2. फळसेवाडीतील 18 वर्षांवरील सर्व ग्रामस्थांनी फळसेवाडी हितकारी संस्थेचा सभासद असणे आवश्यक आहे जेणेकरून संस्थेची सभासदसंख्या वाढून सार्वजनिक हिताची कामे संस्थेच्या माध्यमातून करण्यास बळ मिळेल.

3. फळसेवाडीशी सलग्न सर्व ग्रामस्थाना सभासद करुन घेण्याची कारण फक्त वर नमुद केलेले असल्यामुळे फळसेवाडीशी सलग्न कोणाही ग्रामस्थांने संस्थेचा सभासद न होण्याचे कारण लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे.

4. राजीनाम्याचे कारण सयुक्तिक असल्यास संस्था त्या कारणाचे निराकरण करण्याचा प्रयत्न नक्कीच करेल परंतू सयुक्तिक कारणांशिवाय राजीनामा देत असल्याचे किंवा सभासदत्व न स्विकारत असल्याचे निर्दशनास आल्यास अश्या ग्रामस्थास संस्थेबद्दल किंवा वाडीबद्दल आत्मीयता नाही अशी नोंद घेऊन त्याचा राजीनामा स्विकारेल किंवा त्याचे संस्थेचे सभासदत्व न स्विकारणे मान्य करेल.

5. यापुढे आर्थिक बाबीवर संस्थेने विचार करुन सभासद होणे कोणाही ग्रामस्थास आर्थिक दृष्यास कठीण भासू नये म्हणून प्रवेश फी रु.100/- (जी नविन सभासदांनाच प्रवेश घेताना भरावयाची आहे) इतकी नाममात्र ठेवली आहे.

6. तसेच वार्षिक फी रु.600/- (म्हणजे रु.50 प्रति महिणा) इतकी शुल्लक ठेवली आहे. सभासदास म्हणजेच वरिष्ठ ग्रामस्थ, नोकरी / व्यवसाय न करणारी मुले आणि गृहिणी ज्यांस नियमीत उत्पन्नाचे साधन नाही यांचेवर या वार्षिक फी चा भार पडू नये याचाही विचार करून त्यांस वार्षिक फी न भरण्याची सवलत दिलेली आहे.

7. ज्या सभासदांचा मागील थकबाकी भरण्यास नकार आहे त्यांस संस्थेतर्फे सांगावयाचे आहे की गेल्या वर्षापर्यंत वार्षिक वर्गणी ही रु.60/- म्हणजेच मासिक वर्गणी रु.5/- इतकी शुल्लक होती. परंतू ही वर्गणी वेळच्यावेळी न भरली गेल्याकारणे गेल्या 20 वर्षाची थकबाकी जमा झाली जी रु.1200/- पेक्षा भरणार नाही. त्यामुळे ही थकबाकी एकरकमी भरणे कोणाही सभासदास अशक्य नाही. कोणाही सभासदाने मी राजीनामा दिलेला असल्यामुळे थकबाकी भरु इच्छित नाही ही सबब संस्थेस देऊ नये. कारण कोणाही सभासदांने सयुक्तिक कारणांशिवाय संस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा देणे हे संस्थेस अपेक्षितच नाही.

8. फळसेवाडीशी सलग्न 18 वर्षावरील प्रत्येक ग्रामस्थाने नाममात्र शुल्क रु.100/- हे भरुन फळसेवाडी हितकारी संस्थेचा सभासद झालेच पाहिजे अशी संस्थेची इच्छा आहे. दिनांक 31 मार्च 2017 पूर्वी पासून असलेल्या सभासदांपैकी जे वरिष्ठ नागरीक आहेत किंवा ज्यास रु.600/- वार्षिक फी भरणे आर्थिक दृष्ट्या शक्य नाही त्यांनी 31 मार्च 2018 पासून वार्षिक फी न भरण्यासाठी दिलेल्या सवलतीचा लाभ घ्यावा.

त्यांनतर श्री रविंन्द्र भगवान राणे यांनी संस्था करत असलेली कार्ये खरोखरच प्रशंसनीय असल्याचे सांगून त्यांचे स्वर्गवाशी बंधु कै हनुमंत भगवान राणे यांचे स्मरणार्थ श्रीमती संगिता हनुमंत राणे या संस्थेच्या कार्यासाठी रु.5,000/- ही देणगी देऊ इच्छितात असे सांगून देणगीच्या रक्कमेचा धनादेश सचिवांकडे सुपूर्द केला. सचिवांनी श्री रविंन्द्र भगवान राणे यांनी दिलेला धनादेश साभारपुर्वक स्विकारुन त्यांस धन्यवाद दिले आणि त्यांनी दिलेल्या देणगीची पावती त्यास लवकरच पाठविण्यात येईल तसेच या देणगीची नोंद संस्थेच्या संकेतस्थळावर करण्यात येईल असे सांगितले.

त्यांनतर श्री रत्नकांत बालशिवाजी राणे यांनी त्यांनी भराणा केलेल्या थकबाकीची तसेच त्यांच्या कुटूंबियानी भरलेल्या प्रवेश फी ची पावती त्यांस संस्थेकडून अद्याप मिळालेली नाही असे सांगितले असता श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला काही सभासदांस पोष्टाव्दारे पावत्या पाठविण्याचा प्रयत्न केला होता. परंतू पोष्टाच्या दिरंगाई किंवा निष्काळजीपणामुळे सभासदांपर्यत पावत्या पोचत नाहीत. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे यांस सांगण्यात आले त्यांची पावती देखील पोष्टाने पाठविण्यात आलेली असून आवश्यकता असल्यास पाठविलेल्या पत्राची प्रत त्यांस परत पाठविण्यात येईल.

त्यांनतर उपस्थितांकडून इतर कोणतेही विषय न मांडण्यात आल्यामुळे सचिवांनी ग्रामस्थांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. सचिवानी आता सर्वसाधारण सभांस होत असलेल्या ग्रामस्थांच्या उपस्थितीबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामस्थांनी कार्यकारीणी विश्वास ठेवून सभास उपस्थित राहून चर्चेत भाग घेतला पाहीजे अशी इच्छा व्यक्त केली. कार्यकारीणीकडून काही गोष्टी राहून जात असल्यास ग्रामस्थांनी जागरुकपणे त्या कार्यकारीणीच्या

निर्दशनास आणून दिल्यास कार्यकारीणी त्यात सुधारणा करण्याचा नक्कीच प्रयत्न करील. सचिवांनी उपस्थितांस सांगितले यावर्षी बरीचशी कामे श्री दशरथ दत्ताराम साटम यांच्या मार्गदर्शन व आर्थिक पाठबळामुळे सुकर झाली आहेत याची नोंद सभागृहाने घ्यावी.

सचिवांनी शेवटी सभेस हजर असलेल्या सर्व उपस्थितांचे संस्थेच्या वतीने पुन्हा एकदा आभार मानले आणि राष्ट्रगीताने वार्षिक सर्वसाधारण सभेची समाप्ती केली.

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे | श्री पांडूरंग सावजी राणे |
| सचिव | सभाध्यक्ष व कार्यकारीणी सदस्य |

।। श्री रामेश्वर प्रसन्न ।।　　।। श्री लिंगेश्वर प्रसन्न ।।
फोन नं. : २६७३ २७२६
मो. नं. : ९८६९१ ७०१९९

# फळसेवाडी हितकारी संस्था, (रजि. मुंबई)

द्वारा : कर्मचारी निवास, २/१४, शहाजी राजे भोसले, क्रिडा संकुल, जे. पी. मार्ग, अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५३.
रजि. क्र. : महाराष्ट्र शासन / एफ / १७१२९ / मुंबई / ९२

## वार्षिक सर्वसाधारण सभा – नोटीस

अहवाल वर्ष 2017 -18

सन्माननिय सभासद / ग्रामस्थ,

आपणांस कळविण्यात येते की फळसेवाडी हितकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक 11ऑगष्ट 2018** रोजी सायंकाळी 5:30 वाजता "**सोशल सर्विस लीग शाळा**", दामोदर हॉल जवळ, विठ्ठल चव्हाण मार्ग, परेल, मुंबई – 400 012 येथे आयोजित करण्यात आलेली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेच्या सभासदांना तसेच ग्रामस्थांना एकत्रित येण्यासाठी उपलब्ध असलेले एकमेव व्यासपीठ असून या व्यासपीठावर महत्वाच्या विषयांवर चर्चा करुन ग्रामस्थांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येणार असल्यामुळे सभेस आपली उपस्थिती आवश्यक आहे.

## कामकाजाचे विषय

1. मागील वर्षी दिनांक 15 एप्रिल 2017 रोजी मुंबई येथे घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सभासदांनी / ग्रामस्थांनी अंतिम स्वरुप दिलेले आणि कार्यकारीणीच्या दिनांक 17 जून 2017 रोजीच्या सभेत मंजूर करण्यात आलेले विशेष सर्वसाधारणे सभेचे इतिवृत्त प्रथेनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करणे (इतिवृत्ताची प्रत तक्ता क्रमांक 1 मध्ये दिली असून इतिवृत्ताचे वाचन सभेत केले जाणार नाही).

2. गणेशोत्सवादरम्याण दिनांक 27 ऑगष्ट 2017 रोजी गावी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सभासदांनी / ग्रामस्थांनी अंतिम स्वरुप दिलेले या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त प्रथेनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करणे (इतिवृत्ताची प्रत तक्ता क्रमांक 2 मध्ये दिली असून इतिवृत्ताचे वाचन सभेत केले जाणार नाही).

3. दिनांक 15 एप्रिल 2017 आणि दिनांक 27 ऑगष्ट 2017 रोजी झालेल्या सभांच्या इतिवृत्तानुसार संस्थेने केलेल्या कामाची / कार्यवाहीची नोंद घेणे (संस्थेने अहवाल वर्षात केलेल्या कामाची / कार्यवाही संबधी माहीती संस्थेच्या अहवालामार्फत पुरविली आहे).

4. दिनांक 31 मार्च 2018 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे हिशेबपत्रक आणि ताळेबंद तसेच शासकिय लेखा परिक्षकाकडून मिळालेल्या हिशेब तपासणी अहवालावर चर्चा करून हिशेब पत्रके मंजूर करणे.

5. कार्यकारीणीकडून मांडण्यात येणाऱ्या खालील प्रस्तांवांवर चर्चा करून निर्णय घेणे –
   **प्रस्ताव क्रमांक 1** : गावाचे ग्रामदैवत श्री लिंगेश्वर देवालयाच्या जिर्णोध्दाराच्या निमित्ताने फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे मंदिरातील खांब अथवा पायरी पुरस्कृत करणे.
   **प्रस्ताव क्रमांक 2** : तलाठी कार्यालयाकडून सात-बारा उतारा मिळवून देणे, जमीन मोजणीसंबधी भुमि अभिलेख कार्यालयाशी संर्पकात राहून भुमापनासाठी आवश्यक पुर्वतयारी करणे इत्यादी सभासदांच्या कामासाठी संस्थेच्या माध्यमातून सशुल्क सहाय्य पुरविणे.
   **प्रस्ताव क्रमांक 3** : संस्थेच्या माध्यमातून वनीकरण योजना राबविणे (पुढील 24 महिण्यांमध्ये किमान 500 मुख्यतो रायवळ आंबा, फणस, जांभळ, चिंच, चाराबोरी, रतांबे, साग या प्रकारातील झाडांची लागवड करणे).
   **प्रस्ताव क्रमांक 4** : वाडीतील घरांजवळील पडीक शेतजमीनीवर सामुहिक शेती धोरणाखाली अपरंपरागत परंतू विक्रमी उत्पादन व अर्थाजन मिळवून देणाऱ्या पिकांची, भाजीपाल्याची किंवा फळझाडांची लागवड करण्याबाबत विचार करणे.

6. कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक असणाऱ्या नविन उमेदवारांची नोंद घेऊन त्यांच्या कार्यकारीणीवरील निवडीसाठी आवश्यक असलेली कार्यवाही करणे (**प्रस्ताव क्रमांक 5**).

7. कार्यकारीणीच्या दिनांक 23 जून 2018 रोजी झालेल्या सभेत गावी गणपती उत्सवादरम्याण घेण्यात येणाऱ्या सर्वसाधारण सभेची तारीख शुक्रवार दिनांक 14 सप्टेंबर 2018 ही ठरविण्यात आलेली असून या सभेच्या तारखेस सभासदांची मंजूरी मिळविणे आणि कार्यक्रमाची आखणी करणे.

8. आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी सभासदांमधून अंर्तगत लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.

9. आर्थिक वर्ष 2018 – 19 साठी शासकिय लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.

10. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या वतीने

दिनांक : 21 जुलै 2018.
मुंबई

(**सुनिल सदानंद राणे**)
सचिव

## महत्वाच्या सूचना

1. गेले वर्षभर संस्थेमार्फत नवीन सभासद नोंदणी अभियान सुरू असल्यामुळे आणि सभासद नोंदणी अद्यापही पूर्ण झालेली नसल्यामुळे या सभेस गणसंख्येचे बंधन नाही, परंतू वेळेवर उपस्थित राहणाऱ्या वक्तशीर सभासदांचा / ग्रामस्थांचा वेळ वाया जाऊ नये या उध्देशाने सभा ठरविलेल्या वेळेवर सुरु करण्याचे प्रयोजन असून सभासदांनी / ग्रामस्थांनी वेळेवर उपस्थित राहण्याची काळजी घ्यावी.

2. दिनांक 31 मार्च 2018 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे हिशेबपत्रक व ताळेबंद यासंबधी सभासदांना / ग्रामस्थांना काही माहीती / खुलास हवा असल्यास त्यांनी श्री उदय भगवान राणे, खजिनदार (मो क्र 98694 72115) अथवा श्री सुनिल सदानंद राणे, सचिव (मो क्र 99698 07456) यांच्याशी पत्रव्यवहार / संर्पक करावा, जेणेकरुन सभेदरम्याण आवश्यक कागदपत्रांसहित खुलास करणे शक्य होईल.

3. कार्यकारीणी सदस्य होण्यास इच्छूक सभासदांनी आपल्या उमेदवारीचा अर्ज सूचक व अनुमोदकाच्या मान्यतापत्रासहित सचिवांकडे किंवा आपल्या विभागातील कार्यकारीणी सदस्याकडे सभेच्या तारखेपूर्वी दाखल करावा.

4. कार्यकारीणी सदस्य होण्यास इच्छूक ग्रामस्थांनी आपल्या उमेदवारीचा अर्ज **संस्थेच्या सभासदत्वाच्या अर्जासहित** आणि सूचक व अनुमोदकाच्या मान्यतापत्रासहित सचिवांकडे किंवा आपल्या विभागातील कार्यकारीणी सदस्याकडे सभेच्या तारखेपूर्वी दाखल करावा.

5. सभासदांना / ग्रामस्थांना संस्थेच्या कामकाजासंबधी कोणतीही माहीती / खुलासा हवा असल्यास त्यांनी त्याबाबत आगाऊ लेखी सुचना सचिवांस किंवा आपल्या विभागातील कार्यकारीणी सदस्यांस देणे आवश्यक आहे. आगाऊ सुचनेशिवाय सर्वसाधारण सभेत अकस्मितरित्या उपस्थित केलेल्या प्रश्नासंबधी / विषयासंबधी खुलासा करणे कार्यकारीणीस शक्य नसल्यास अश्या प्रश्नांची सभेदरम्याण फक्त नोंद घेण्यात येईल.

6. ज्या सभासदांना आपली वार्षिक वर्गणी इंटरनेट बँकींग माध्यमातून भरावयाची इच्छा असेल त्यांसाठी संस्थेच्या खात्याची माहीती खाली दिली आहे.

**बँकऑफ इंडीया**
वर्सोवा सी एन्ड पी बँकींग शाखा,
अंधेरी पश्चिम, मुंबई – 400058.
खाते क्रमांक : **006110210000003**
IFSC कोड : **BKID0000061**
MICR कोड : **400013054**

**Bank of India**
Varsova C & P Banking Branch,
Andheri West, Mumbai – 400058.
Account No : **006110210000003**
IFSC Code : **BKID0000061**
MICR Code : **400013054**

सभासदांना विनंती करण्यात येते की इंटरनेट बँकींग माध्यामतून पैसे भरल्यानंतर त्यांनी त्याबद्दल माहीती श्री मंगेश मनोहर राणे, अध्यक्ष आणि श्री दशरथ दत्ताराम साटम, कार्यकारीणी सदस्य यांस द्यावी जेणेकरुन पावती बनवून आपणांस पाठवता येईल.

# वार्षिकअहवाल

वर्ष 2017 – 18

सन्माननिय सभासद / ग्रामस्थ बंधु-भगिनींस

सप्रेम नमस्कार,

गेल्या वर्षी दिनांक 15 एप्रिल 2017 रोजी विशेष सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपण एकत्र आलो होतो. कित्येक वर्षांनतर आयोजिलेल्या या सभेस सभासदांव्यतिरिक्त ग्रामस्थांसही निमंत्रण देण्यात आले होते. बऱ्याच कालावधीनंतर घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेस असलेली लक्षणीय उपस्थिती आम्हास हुरुप देणारी होती.

या सभेत संस्थेच्या पुढील वाटचालीची आखणी करण्यात येऊन ग्रामस्थांच्या हिताच्या दृष्टीने खालील प्रस्तांवावर चर्चा करण्यात आली.

1. वाहनरस्त्याची सुविधा तसेच रस्त्यांचे डांबरीकरण
2. नळ योजनेव्दारे पाणीपुरवठा
3. वाडीवर सार्वजनिक दिवाबत्ती / स्ट्रीटलाईट योजना
4. सभासद नोंदणी मोहीम
5. स्थानिक ग्रामस्थांचा फळसेवाडी हितकारी संस्थेत क्रियाशिल सहभाग

या वार्षिक अहवालाच्या निमित्ताने गेल्या वर्षभराच्या काळात संस्थेने वरील प्रस्तावांच्या संर्दभात केलेल्या वाटचालीचा संक्षिप्त लेखाजोखा आपणांपुढे कार्यकारीणीच्या वतीने ठेवताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

## वाहनरस्त्याची सुविधा तसेच रस्त्यांचे डांबरीकरण

### <u>फळसेवाडी शाळा ते तांबळ (गाडीतळ) मुख्य रस्ता</u>

गेले वर्षभर ग्रामपंचायतीशी संर्पकात राहून संस्थेने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रयत्न केले. संस्थेने सतत पाठपुरावा करुन श्री सुहास राणे, सरपंच यांना या कामाबाबत दखल घ्यावयास लावून काम करुन देण्याचे आश्वासन मिळविण्यात जरी यश मिळविले असले तरी फंडाच्या अभावी वर्षभरात काम पूर्ण करुन घेण्यात सफलता लाभली नाही. परंतू दिलेल्या शब्दाखातर अहवाल वर्षानंतर मे 2018 या महीण्यात या रस्त्याच्या काही भागाच्या (अंदाजे 80 मीटर) दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीने आगाऊ कंत्राट देऊन करुन घेतले, फंड उपलब्ध नसतांनादेखील हे काम आगाऊरित्या करुन घेण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री सुहास राणे आणि स्थानिक ग्रामस्थ श्री अंकुश मारुती राणे यांनी प्रयत्न केले.

### <u>फळसेवाडी मुख्य रस्ता (गाडीतळ) ते टेंबावरील श्री पांडूरंग सावजी राणे यांचे घर</u>

जवळपास 2013 पासून काही अडचणींमुळे प्रतिक्षेत असलेला गाडीतळ ते टेंब या वाहनरस्त्यातील शेवटचा टप्पा म्हणजेच विठोबा साटम घर ते टेंब पांडूरंग सावजी राणे घर हा जवळपास 82 मीटर लांबीचा (3.50 मीटर रुंदीचा) रस्ता ग्रामपंचायतीने दिनांक 8 मे 2017 रोजी ग्रामसभेत ठराव मांडून (ठराव क्रमांक 4(1))

ग्रामपंचायत नमुना 23 (ताब्यातील रस्त्यांची नोंदवही) ला नोंद करुन घेतला असून, सरपंचांकडून मिळालेल्या आश्वासनानुसार यावर्षी नोव्हेंबर नंतर या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण होणे अपेक्षीत आहे.

या रस्त्याचे डांबरीकरण झाल्यावर टेंबावरील ग्रामस्थांची बाराही महिने मुख्यतो पावसाळ्यात अडीअडचणीच्यावेळी घराजवळ वाहने घेऊन जायची सोय होणार आहे. हे काम लवकरात लवकर मार्गी लागावे म्हणून संस्था प्रयत्नशील आहे. यावर्षी पावसाळ्यात ग्रामस्थांची सोय व्हावी या उध्देशाने विठोबा साटम यांच्या घराजवळ डोंगरातून वाहत येणाऱ्या पाण्यास मार्ग द्यावा जेणेकरून मातीचा रस्ता वाहून जाऊन रस्त्यावर चिखल होणार नाही यासाठी तात्पुरती उपाययोजना म्हणून सस्थेच्या माध्यमातून मोरी बांधण्याचे तसेच रस्त्याच्या चिखल होऊ शकणाऱ्या काही भागात फुटकळ टाकण्याचे प्रयत्न चालू आहे.

## नळ योजनेव्दारे पाणीपुरवठा

मागील विशेष सर्वसाधारण सभेनंतर गेले वर्षभर पहिल्या टप्याचे काम म्हणजे पाण्याच्या टाक्या ठेवण्यासाठी कॉक्रीटचे स्ट्रक्चर उभारणे यासाठी कंत्राटदार मिळविण्यासाठी प्रयत्नही करून यश न मिळाल्याकारणे अहवाल वर्षी हे काम मार्गी लागू शकले नाही. परंतू यावर्षाच्या सुरवातीसच कंत्राटदार मिळाल्यामुळे पहिल्या टप्याचे काम म्हणजे पाण्याची टाकी उभारण्याचे काम जून 2018 पर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहे. हे काम मार्गी लावण्यासाठी कार्यकारीणी सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे यांनी पुढाकार घेऊन त्यांनी स्वत: तसेच कार्यकारीणी सदस्या सौ अनुजा अरुण राणे यांनी या कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी घेतली आहे. या पाणीपुरवठा योजनेअर्तंगत आवश्यक असलेली पुढील टप्प्यांची कामे हाती घेऊन पुर्ण करण्यात येत असून गणेश चतुर्थीपूर्वी स्वयंपूर्ण नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा योजना पुर्णत्वास नेण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे गणपती उत्सवादरम्याण ग्रामस्थांच्या घरात सर्वांच्या सोईच्या वेळेनुसार पाणी पोहचविण्यात यश मिळेल ही खात्री आहे.

## वाडीवर सार्वजनिक दिवाबत्ती / स्ट्रीटलाईट योजना

मागील विशेष सर्वसाधारण सभेत वाडीवर सार्वजनिक दिवाबत्ती (स्ट्रीटलाईट) योजना राबविण्यासंबधी चर्चा करण्यात आली होती. कार्यकारीणीने गणेश चतुर्थीपूर्वी वाडीवर दिवाबत्ती लावण्याचा प्रयत्न करण्यासाठी श्री विजय संभाजी राणे यांच्याशी संर्पक करून त्यांच्या संर्पकमाध्यमातून आठ LED दिवे (60 वॅटचे दोन आणि 40 वॅटचे सहा) मिळविले. गणपती उत्सवादरम्याण हे दिवे लावण्यात आले असून आठ दिव्यांपैकी चार दिवे ग्रामपंचायतीच्या स्ट्रीटलाईट योजनेच्या खांबावर आणि चार दिवे वाडीवर सर्वास सोयीच्या जागी, जवळच्या घरातून तात्पुरते लाईट कनेक्शन घेऊन चालू करण्यात आले आहेत. गणपती उत्सवादरम्याण काम करण्यासाठी कामगार / मजूरदार मिळत नसतेवेळी काम पूर्ण व्हावे यासाठी श्री संकेत रत्नाकर राणे यांनी लाईट पोल इत्यादि सामानाची जुळवाजुळव केली तसेच श्री स्वप्नील पांडूरंग राणे यांनी स्थानिक तसेच मुंबईहून गावी गेलेल्या युवकांना हाताशी धरुन पोल पुरुन घेण्याचे आणि लाईट लावण्याचे काम पूर्ण करून घेतले.

आपल्या माहीतीसाठी येथे नमुद करणे अत्यावश्यक आहे की संस्थकडे या कामासाठी निधीची उपलब्धता नसतांना देखील श्री विजय संभाजी राणे यांनी संस्थेने हाती घेतलेले विधायक काम पूर्ण व्हावे या प्रामाणिक

हेतूने स्वतःच्या जोखमीवर / पतीवर काहीही रक्कम आगाऊ न घेता LED दिवे त्यांच्या संर्पकातील कंपनीकडून उपलब्ध करुन दिले.

सध्या या आठ दिव्यांपैकी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेवर असलेले चार दिवे नियमीत चालू असून उरलेले चार दिवेही सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेवर टाकण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. आवश्यक असलेल्या वायरची व्यवस्था झाल्यावर उर्वरीत चार दिवेही सार्वजनिक दिवाबत्ती योजनेवर टाकण्यात येतील. यावर्षी शक्य झाल्यास टायमर किंवा सेन्सर लावून ही व्यवस्था स्वयंचलित करता येईल का ? याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

## सभासद नोंदणी मोहीम

मागील 15 एप्रिल 2017 च्या विशेष सर्वसाधारण सभेदरम्याण फळसेवाडीतील 18 वर्षांवरील सर्व ग्रामस्थांस फळसेवाडी हितकारी संस्थेचे सभासद होण्यास प्रवृत्त करुन संस्थेचे सांख्यिक बळ वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले होते. सभासद नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या फार्मची तातडीने छपाई करण्यात येऊन दिनांक 17 जून 2017 रोजीच्या कार्यकारीणीच्या सभेत ग्रामस्थांशी संर्पक करण्यासाठी कार्यकारीणी सदस्यांची / ग्रामस्थांची विभागवार नेमणूक करण्यात आली. अहवाल वर्षाच्या अखेरीस म्हणजेच 31 मार्च 2018 पर्यंत इच्छूक 95 ग्रामस्थांपैकी 93 ग्रामस्थांनी संस्थेच्या सभासदत्वाचे फार्म भरुन दिले असून यापैकी 68 ग्रामस्थांनी सभासदत्वासाठी प्रथमच अर्ज केला आहे.

आपल्या माहीतीसाठी कळविण्यात येते की अहवाल वर्षानंतर पुढील तीन महिण्यात म्हणजे 30 जून 2018 पर्यंत 142 सभासदत्वाचे फार्म जमा झालेले असून या तारखेपर्यंत सभासद मोहीमे अर्तंगत करण्यात आलेल्या प्रगतीचा तपशील खाली दिला आहे.

| | **सभासद संख्या** |
|---|---|
| 15 एप्रिल 2017 पूर्वी असलेले सभासद (हयात) | 73 |
| 15 एप्रिल 2017 नंतर 30 जून 2018 पर्यंत झालेले सभासद | 102 |
| **30 जून 2018 रोजी संस्थेची एकूण सभासद संख्या** | **175** |

### 30 जून 2018 रोजी असलेल्या सभासदांचा तपशील

| | **पुरुष सभासद** | **स्त्री सभासद** | **एकूण सभासद** |
|---|---|---|---|
| 30 जून 2018 रोजी सभासद संख्या | 107 | 68 | 175 |
| वार्षिक फी भरू इच्छिनारे सभासद | 70 | 34 | 104 |

संस्थेकडे उपलब्ध असलेल्या माहीतीनुसार फळसेवाडीशी जवळजवळ 468 ग्रामस्थ संलग्न असून त्यापैकी जवळपास 301 ग्रामस्थ (उपलब्ध जन्मतारखेनुसार) 18 वर्षावरील आहेत, तसेच 126 ग्रामस्थांच्या जन्मतारखेची नोंद संस्थेकडे नसल्यामुळे त्यांच्या वयाचा अंदाज नसून उर्वरीत 38 ग्रामस्थ 18 वर्षाखालील आहेत.

कार्यकारीणी सभासद नोंदणी अभियान 2018 – 19 या आर्थिक वर्षात पुर्णत्वास नेण्याच्या प्रयत्नात असून आपणां सर्व ग्रामस्थांचे सहकार्य अपेक्षित आहे.

## स्थानिक ग्रामस्थांचा फळसेवाडी हितकारी संस्थेत क्रियाशील सहभाग

स्थानिकांचा संस्थेच्या कार्यात सहभाग असावा या उध्देशाने गेल्या सर्वसाधारण सभेनंतर स्थानिकांनी सुचविलेल्या तीन ग्रामस्थांना म्हणजेच सौ अनुजा अरुण राणे (मो क्र 90497 63370), श्री संकेत रत्नाकर राणे (मो क्र 77209 81858) आणि श्री रामदास मारुती राणे (मो क्र 96897 89755) यांना कार्यकारीणी सदस्य करण्यात आलेले आहे. ग्रामस्थांच्या हितासाठी करण्यात येणारी सर्व स्थानिक कामांची जबाबदारी पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचेवर सोपविण्यात येत असून त्यांच्या कार्यतत्परतेनुसार पुढील कामे त्यांच्या पुढाकाराखालीच करुन घेण्याचा मानस आहे.

## आर्थिक वर्ष 2017 – 18 हिशेब पत्रके

दिनांक 31 मार्च 2018 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात वार्षिक वर्गणी भरु इच्छिनाऱ्या 102 सभासदांकडून वार्षिक वर्गणी स्वरुपात रु.61,200/- जमा होणे अपेक्षित होते त्यापैकी 57 सभासदांकडून रु.34,150/- रुपये जमा झालेले असून उर्वरीत सभासदांकडून वार्षिक वर्गणी येणे आहे. तसेच आर्थिक वर्षात श्री रंजन रावजी म्हसकर यांचेकडून रु.5,000/- हे देणगी स्वरुपात प्राप्त झाले आहेत.

आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या खर्चापैकी रु.13,138/- सार्वजनिक पथदिवे व्यवस्था उभारणीसाठी, रु.41,500/- पाणीपुरवठा योजने अंर्तगत पाण्याच्या जागेचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि ब्राह्मण विहीरीची सफाई करण्यासाठी खर्च करण्यात आले. अहवालवर्षी संस्थेकडून एकूण रु.69,146/- विविध बाबींवर खर्च करण्यात आलेले असून संस्थेच्या उत्पन्नापेक्षा रु.2,946/- एवढी रक्कम जास्त खर्च झाली आहे.

31 मार्च 2017 रोजी हयात असलेल्या सभासदांकडून येणे असलेल्या रु.66,445/- या थकबाकीपैकी रु.23,100/- एवढ्या रक्कमेचा भराणा आर्थिक वर्षात सभासदांकडून झालेला असून हा भराणा एकूण रक्कमेच्या 34% इतका आहे. आर्थिक वर्षा अखेरीस सभासदांकडून वार्षिक वर्गणी थकबाकी स्वरुपात रु.72,365/- इतकी रक्कम येणे शिल्लक असून त्यापैकी रु.27,050/- ही थकबाकी आर्थिक वर्ष 2017 – 18 ची आहे. सभासदांकडून येणे असलेली थकबाकी ही मुख्यतो काही सभासदांपर्यत अद्याप संर्पक न झाल्यामुळे असून अहवाल वर्षात सर्पंक करण्यात आलेल्या सर्व सभासदांनी विनातक्रार थकबाकीचा भराणा करुन कार्यकारीणीवर विश्वास दाखविला आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे संस्थेने आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता व्यवहारात आणण्याचा प्रयत्न सुरु केला असून आपले सर्वांचे सहकार्य लाभल्यास संस्था यशस्वीपणे पुढील मार्गक्रमण करुन ग्रामस्थांचे राहणीमान उंचावू शकेल अशी आम्हास खात्री आहे.

**ऋणनिर्देश**

सभासदांच्या आणि वाडीतील रहिवाश्यांच्या सुखसोयीसाठी संस्था बांधिल असून कार्यकारीणी याबाबत तत्परतेने कार्यरत राहील याची आम्ही खात्री देत आहोत. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे आणि स्वयं:शिस्तीमुळे तसेच वेळोवेळी सर्वानुमते ठरविण्यात आलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यामुळेच ही बाब शक्य होईल असे आम्हास वाटते. ग्रामस्थांच्या हितासाठी आवश्यक असलेले आणि संस्थेने सर्वानुमते केलेले नियम प्रत्येक सभासद / ग्रामस्थ काटेकोरपणे पाळतील अशी कार्यकारीणीस खात्री आहे.

संस्थेचे सभासद आणि ग्रामस्थ यांनी गेल्या वर्षभराच्या काळात सयंम बाळगून कार्यकारीणीवर जो विश्वास दाखविला आणि या काळात सहकार्य केले याबद्दल कार्यकारीणी त्यांची ऋणी आहे. तसेच जे सभासद आणि ग्रामस्थ हस्ते-परहस्ते वेळोवेळी कार्यकारीणीस मार्गदर्शन व मदत करत आहेत आणि ज्यांच्या सहकार्यामुळेच संस्थेचे कामकाज करणे कार्यकारीणीस सुसह्य होत आहे त्या सर्वांची कार्यकारीणी शतशः ऋणी आहे.

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या वतीने

दिनांक : 20 जुलै 2018
मुंबई

(**श्री मंगेश मनोहर राणे**)
अध्यक्ष

प्रस्ताव क्रमांक 1

## गावचे ग्रामदैवत श्री लिंगेश्वर देवालयाच्या जिर्णोध्दाराच्या निमित्ताने फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे सभामंडपाचा एखादा खांब किंवा मंदिराची एखादी पायरी पुरस्कृत करणे

आपणांस माहित असेलच की गावचे ग्रामदैवत श्री लिंगेश्वर मंदिराचा जिर्णोध्दार करण्याचा संकल्प गावाने केला असून पिसेकामते विकास मंडळाच्या पुढाकारातून निधी उभारणी सुरु आहे. यावर्षी मे महिण्यात कंत्राटदाराची निवड करण्यात आलेली असून दसऱ्या दरम्याण काम सुरु होणार आहे. जिर्णोध्दारासाठी निधी उभारण्यासाठी पिसेकामते विकास मंडळाने नवीन योजना आखलेली असून या नविन योजने अर्तंगत ग्रामस्थास ठराविक रक्कम देऊन देवालयाचे खांब किंवा पायरी पुरस्कृत करता येणार आहे.

या योजनेसंबधी माहिती आपणांस पुरविण्यात आली असून महत्वाची बाब म्हणजे पुरस्कर्त्याने सुचविलेली जास्तीत जास्त दोन नावे पुढील 50 ते 60 वर्षे देवालयाच्या वास्तूवर झळकत राहणार आहेत. पुरस्कृत करण्यासाठी कमीतकमी रक्कम रु.15,000/- (गाभाऱ्यामागील खांब) आणि जास्तीत जास्त रक्कम रु.1,00,000/- (गाभाऱ्याच्या प्रवेशदाराचे खांब) असून या योजने अर्तंगत अर्ज भरुन देण्याची शेवटची तारीख 15 सप्टेंबर 2018 हि आहे.

ग्रामस्थांकडून वैयक्तिकरित्या खांब / पायरी पुरस्कृत करण्याव्यतिरिक्त पिसेकामते गावातील सात वाड्यांपैकी काही वाड्यांतून संपूर्ण वाडीतर्फे एखादा खांब पुरस्कृत करण्यासाठी हालचाली सुरु आहेत. फळसेवाडी हितकारी संस्थाही असा विचार करत असून फळसेवाडीशी हितकारी संस्थेकडे आजपर्यंत जवळपास 108 ग्रामस्थांचे पत्ते उपलब्ध असून या ग्रामस्थांनी स्वेच्छेने कमीतकमी रु.500/- इतकी रक्कम फळसेवाडी हितकारी संस्थेकडे जमा केल्यास जवळपास रु.50,000/- इतकी रक्कम जमा होऊ शकेल. या रक्कमेत फळसेवाडी हितकारी संस्थेमार्फत देवालयाच्या सभामंडपातील एखादा खांब आपणांस पुरस्कृत करता येईल. अपेक्षेपक्षा जास्त रक्कम जमा झाल्यास आपण गाभाऱ्याच्या प्रवेशव्दाराचा एक खांब (रु.100,000/-) किंवा मंदिराच्या मुख्य प्रवेशव्दाराचा एक खांब (रु.75,000/-) पुरस्कृत करण्याचा विचार करु शकू.

**मंजूरीसाठी प्रस्ताव**

1. फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे श्री लिंगेश्वर देवालयामधील खांब / पायरी पुरस्कृत करण्याचा ठराव मंजूर करणे.
2. फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे श्री लिंगेश्वर देवालयाचा खांब / पायरी पुरस्कृत करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यास संस्थेकडे नोंद असलेल्या 108 ग्रामस्थांस कमीतकमी प्रत्येकी रु.500/- देणगी देण्याची विनंती करणे व ही देणगी लवकरात लवकर म्हणजे 31ऑगष्ट 2018 पूर्वी जमा करण्याची विनंती करणे.
3. जमा झालेल्या रक्कमेनुसार मंदिराचा खांब / पायरी पुरस्कृत करण्याचे सर्वाधिकार कार्यकारीणीकडे सोपविणे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्ताव क्रमांक 2

## तलाठी कार्यालयाकडून सात-बारा उतारा मिळवून देणे, जमीन मोजनीसंबधी भुमि अभिलेख कार्यालयाशी संर्पकात राहून सभासदांचा वेळ वाचावा या हेतूने जमीन मोजनीसाठी आवश्यक पुर्वतयारी करणे इत्यादि सभासदांच्या कामासाठी संस्थेच्या माध्यमातून सशुल्क सहाय्य पुरविणे

फळसेवाडीत आणि आसपासच्या परिसरात आपल्या पूर्वजांनी / वाडवडीलांनी कमावलेली आणि राखून ठेवलेली जमीन आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर किंवा त्या काळाच्या आसपास जन्मलेली पिढी शिक्षणाच्या आणि नोकरीधंद्याच्या निमित्ताने मुंबईत स्थलांतरित होऊन बहुतांशी काळ मुंबईत वास्तव्यास असल्याकारणे त्यांस त्यांच्या गावच्या इस्टेटी / जमीनीसंबधी नीट माहीती नाही किंवा उपलब्ध कागदोपत्री असलेल्या जमीनीचा ठावठिकाण माहीत नाही. गावी वास्तव्यास असलेल्या पिढीसही त्यांच्या जमीनजुमल्याची नीटशी माहिती नसून वर्षांनुवर्षे चालत आलेल्या वहीवाटीनुसार त्यांस आपल्या जमीनीचे ठिकाण माहित असले तरी त्या जमीनीच्या पक्क्या सीमा माहीत नाहीत.

या जमीन मालकीसंबधी असलेल्या संभ्रमाची जाणीव कार्यकारीणी सदस्यांस प्रत्येकवेळी होत असून ब्राम्हणाची विहीर असलेल्या जमीनीचा गट क्रमांक कोणता व ती कोणाच्या जागेत आहे, डोहाच्या चिंचेजवळ प्रायोजित विहीरीसाठी असलेल्या जमीनीचा गट क्रमांक कोणता व ती कोणाची आहे किंवा नुकतीच बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीची जागा कोणाच्या सीमेमध्ये होती / आहे याबाबत संभ्रम निर्माण झाले.

ग्रामस्थांमधील सुसंवादामुळे आणि सामंजस्यामुळे जरी सार्वजनिक कामासाठी जमीन उपलब्ध झाली तरी कायदेशीर कागदपत्रे म्हणजेच बक्षीसपत्र किंवा करारपत्र पूर्ण करण्यासाठी यातून मार्ग मिळत नाही त्यामुळे जमीनीच्या ठिकाणांबाबत, गट क्रमांकाबाबत व सीमांबाबत स्पष्टता येणे जरुरीचे आहे.

काही जागरुक ग्रामस्थांनी त्यांच्या स्वतःच्या जमीनीची माहीती मिळविण्यासाठी वैयक्तिक पातळीवर प्रयत्न सुरु केले आहेत परंतू हे प्रयत्न फक्त सात-बारा उतारे मिळविण्यापर्यंतच मर्यादित राहिले. वाडीतील बहुतांशी ग्रामस्थ मुंबईत वास्तव्यास असल्यामुळे आणि फक्त गणपती उत्सवादरम्याण किंवा शाळांच्या उन्हाळी सुट्टीत त्यांचे गावी जाणे होत असल्यामुळे त्यापुढील कार्यवाही म्हणजे भुमि अभिलेख कार्यालयाशी संर्पक करुन जमीनीचा ठावठिकाणा शोधने आणि जमीन मोजणी करुन घेणे होत नाही. त्यामुळे आजच्या पिढीस त्यांची किती जमीन आहे याची माहिती कदाचित सात-बारा उताऱ्यावरुन मिळेल परंतू आपली जमीन कोठे आहे, त्या ठिकाणाचे नाव काय आहे आणि त्या जमीनीत झाड-पेड असल्यास ते कोणते आहे तसेच त्या जमीनीचा काय उपयोग करता येईल याबद्दल काही माहिती नाही.

आता ग्रामस्थास भुमि अभिलेखाच्या संकेतस्थळाहून सात-बारा उतारे मिळत असले आणि तलाठी कार्यालयातून साक्षांकित सात-बारा उतारे मिळविण्यासाठी खर्च करणे किंवा भुमि अभिलेखा कार्यालयात जमीन मोजनीसाठी पैसे भरणे खर्चिक वाटत नसले तरी या कामासाठी गावी हेलपाटे घालून प्रवासावर पैसे आणि वेळ खर्च करणे शक्य होत नसल्यामुळे त्यांचेकडून नोकरीधंद्यास असतांना जमीनीचा ठावठिकाणा शोधण्याबाबत काहीच हालचाल केली जात नाही. निवृत्त झाल्यावर काही ग्रामस्थ याबाबत प्रयत्न सुरु करतात परंतू त्यावेळी वय व तब्येत साथ देत नसल्यामुळे धावपळ करणे शक्य होत नाही.

ग्रामस्थांची बहुतांशी जमीन आज लहान तुकड्या तुकड्यात विभागली गेलेली असली तरी आपल्या पूर्वजांनी / वाडवडीलांनी कष्टाने डोंगर उतारावर मेरा बांधून तयार केली आहे. त्याकाळी उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसतांना नड असतांनादेखील ती न विकता पुढील पिढीसाठी राखुन ठेवली आहे. आजच्या काळात त्या जमीनीपासून काही उत्पन्न मिळत नसले तरी कोण जाणे पुढील काळात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग विस्तारीत झाल्यावर तालूका ठिकाणांपासून आपली वाडी जवळच्या अंतरावर असल्यामुळे आपल्या स्वतःच्या जमीनीत आपण काही उद्योगधंदा उभारु शकू. त्यावेळी आपणांस किंवा आपल्या पुढील पिढीस जमीन शोधण्यापासून जमीन मोजणी इत्यादि बाबी करावयास लागल्यास ते फार वेळखाऊ होईल. महत्वाचे म्हणजे पुढील पिढीस आपल्या जमीनीबाबत काहीच माहीती नसल्यामुळे फक्त संशयामुळे कुटुंबात तंटेबखेडे होऊ शकतील.

आपल्या माहीतीसाठी सात-बारा उतारे मिळविणे, जमीन मोजणी संदंर्भात प्राथमिक तयारी करणे यासाठी खालील दोन ते तीन प्रकाचे खर्च येतात –

1. सरकारकडे सात-बारा उतारे, जमीन मोजनीसाठी भरावयास लागणारी फी
2. आपले काम वेळेत होण्यासाठी द्यावयास लागणारी चिरीमीरी आणि
3. मुंबईहुन गावास जाण्यासाठी होणार प्रवासखर्च

वरील क्रमांक 1 व 2 वरील खर्च नगण्य असले तरी प्रवासासाठी होणारा खर्च हा कितीवेळा गावी हेलपाटे मारावयास लागतात यावर अवलंबून असतो आणि त्यापेक्षाही या कामासाठी नोकरीधंद्यामधुन वाया जाणारा महत्वाचे वेळ हा पैशातही मोजता येत नाही.

**चर्चेकरीता प्रस्ताव**

तलाठी कार्यालयातून सात-बारा उतारे मिळविणे, जमीन मोजनीसाठी भुमि अभिलेख कार्यालयाशी संर्पकात राहून जमीन मोजनीबाबतची पुर्वतयारी करणे याबाबी संस्थेच्या सभासदास सुसह्य व्हाव्यात या हेतून फळसेवाडी हितकारी संस्था संस्थेमार्फत सशुल्क सहाय्य पुरविण्याचा विचार चर्चेकरीता मांडत आहे.

संस्थेचा यामागे दुहेरी हेतु असुन –

पहिल्या हेतुअन्वये मुंबईस्थित ग्रामस्थाचा तो नोकरीधंद्यासाठी मुंबईत असतांना याकामासाठी लागणार महत्वाचा वेळ वाचावा आणि त्याचबरोबर प्रत्येक वेळी प्रवासावर होणारा अनाठायी खर्च कमी व्हावा आणि

दुसरा हेतु म्हणजे वाडीतील जे स्थानिक ग्रामस्थ शिक्षित आणि माहितगार आहेत त्यांचा फावला वेळ यासारख्या लोकोपयोगी कार्यास लागून त्याचबरोबर त्यास आर्थिक लाभ देखील व्हावा.

वरील प्रस्तावास मंजूरी मिळाल्यास कार्यकारीणी या कामासाठी सरकारकडून आकारण्यात येणारे शुल्क, लागणारा कालवधी आणि नेमणूक करण्यात आलेला स्थानिक प्रतिनिधी यासंबधी माहीती संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करेल.

याबाबतचे सर्व आर्थिक व्यवहार संस्थेमार्फतच होणार असल्याकारणे उपभोक्त्यास काम पुर्ण होण्याची तसेच आर्थिक व्यवहार संपूर्णत: पारर्दशक असल्याची खात्री मिळेल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्ताव क्रमांक 3

## संस्थेच्या माध्यमातून वनीकरण योजना राबविणे

दिनांक 15 एप्रिल 2018 रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या सभेत कार्यकारीणी सदस्य श्री भरत गणपत राणे यांनी खंत मांडली की आपल्या पिढीने वाडीमध्ये काहीच सुधारणा केलेल्या नाहीत, उलटपक्षी आपल्या वाडवडीलांनी राखून ठेवलेली संप्पत्ती नष्ट करण्याचे काम केले. त्यांनी विचार मांडला की आपण जे आता करत आहोत तीच गोष्ट आपल्या वाडवडीलांनी त्यांच्या पिढीत केली असती आणि त्यांच्या पूर्वजांनी कमावलेली संप्पत्ती नष्ट केली असती तर आपणांस काय उरले असते ? कदाचित आपल्यापैकी काही जणांस गावही नसते. प्रत्येक पिढीने आपल्या पुढील पिढीसाठी काय वारसा ठेवत आहोत याचा विचार करावयास हवा.

श्री भरत गणपत राणे यांनी त्यांच्या लहानपणीच्या आठवणी जागवून सांगितले की त्यांचे लहानपणी वाडीच्या परिसरात रायवळ आंबा, फणस, चिंच व शेगलाची झाडे होती. काही ग्रामस्थांनी त्यांची मुलेबाळे गावी येऊन झाडाचा उपभोग घेणार नाहीत असा विचार करुन ती विकल्यामुळे किंवा तोडल्यामुळे वाडीवर आता फारशी मोठी झाडे दिसत नाहीत. तसेच जंगलातील पायवाटा वहिवाट नसल्यामुळे बंद झाल्यामुळे माडाचे पाणी किंवा मदारबाबा या ठिकाणी जाणे होत नाही. करवंदे, चाराबोरे, जांभळे यासाठी रानावनात भटकणे यासारख्या गोष्टी करता येत नसल्यामुळे लहान मुलांना गावी आणल्यावर त्यांच्या मनोरंजनासाठी काय करावयाचे हा विचार येतो. दुदैवाची बाब म्हणजे या कारणांमुळे तरुण पिढी त्यांच्या स्वत:च्या हक्काच्या गावी जाण्यास नाखुष असते.

श्री भरत गणपत राणे यांनी विचार मांडला की ग्रामस्थांना एकत्रित करुन याबाबत त्यास जाणीव करुन द्यावयास हवी. कदाचित पुढील काळी आपल्यासारख्या सामान्य माणसांस मुंबईत राहणे आर्थिक दृष्ट्या कठीण झाल्यास गावी जाण्याचा / राहण्याचा मार्ग उपलब्ध राहील.

श्री भरत गणपत राणे यांच्या विचाराचा धागा पकडून आणि महत्वाचे म्हणजे आपण पुढील पिढीसाठी काहीतरी करावयास हवे याची जाणीव होऊन संस्थेमार्फत वनीकरण योजना राबविण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्याचे प्रयोजन आहे.

या योजने अर्तंगत प्रथम वाडीच्या सभोवतालील परिसरात शक्य होतील त्या ठिकाणी रायवळ-लोणच्याचा-रायत्यासाठी आंबा, कापा-बरका फणस, जांभुळ, चिंच इत्यादि झाडे लावण्याचा विचार असून ती झाडे लावलेली जमीनीची मालकी जमीन मालकाकडेच राहिल. झाडांची देखभाल संस्थेकडून करण्यात येईल आणि त्याबद्दल मोबदला म्हणून जमीन मालकास संस्थेने लागवड केलेल्या झाडापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही अंशी वापर करावयाची सवलत फळसेवाडीतील सर्व ग्रामस्थांना द्यावी लागेल. पुढील वर्षभरात वाडीसभोवतालील परिसरात कमीत कमी अश्याप्रकारची 100 उपयुक्त झाडे लावण्याचा विचार आहे.

त्याचबरोबर ग्रामस्थांच्या रानातील जमीनी त्यांनी वनीकरणासाठी उपलब्ध करुन दिल्यास त्या ठिकाणींही कमीत कमी 500 झाडांच्या लागवडीचा विचार संस्था करत आहे.

या प्रस्तावाबाबत ग्रामस्थांच्या शंकासमाधानासाठी खालील बाबी संस्था स्पष्ट करत आहे –

1. झाडे लागवडीसाठी वापरण्यात येणारी जमीन ग्रामस्थांस संस्थेकडे बक्षिसपत्र करुन द्यावी लागेल का ?
   **नाही**, झाडे लागवडीखाली येणारी जमीन ग्रामस्थाच्या नावावरच राहील परंतू झाडांची लागवड संस्था करणार असल्याकारणे तसेच पुढील चार ते पाच वर्षे त्या झाडांचे संगोपण / जतन करणार असल्यामुळे ग्रामस्थास संस्थेबरोबर एक सामंजस्य पत्र करावे लागेल. या सामंजस्य पत्रा नुसार या लागवडीमुळे पुढे मिळणाऱ्या उत्पन्नापैकी काही हिस्सा स्वखुषीने पुढील 15 वर्षे विनामोबदला फळसेवाडीतील ग्रामस्थांना किंवा त्याच्या मुलाबाळांना उपभोगावयास द्यावयाचे मान्य करावे लागेल.

2. संस्थेने लागवड केलेल्या झाडांपासून मिळणारे उत्पन्न ग्रामस्थांस विकता येईल का ?
   **होय**, या झाडांपासून मिळणारे उत्पन्न जमीन मालकांस विकता येईल परंतू त्यामुळे त्यास आर्थिक फायदा होत असल्यामुळे त्यापैकी काही हिस्सा (कमीत कमी 20%) संस्थेस द्यावयास लागेल. तसेच या विक्रिच्या बाबतीत पारदर्शकता राहावी म्हणून संस्थेच्या पदाधिकाऱ्यामार्फतच विक्रीचे व्यवहार करावे लागतील.
3. संस्थेने लागवड केलेली झाडे तोडता येतील का ?
   ग्रामस्थांच्या पडीक जमीनीत ही लागवड करण्यात येणारअसल्यामुळे ग्रामस्थाने लागवड करण्यात आलेली झाडे कमीतकमी 20 वर्षे न तोडण्याचे बंधन त्यावर राहील आणि अश्याप्रकारच्या अटीचा सामंजस्य पत्रात सामावेश असेल.
4. संस्थेने लागवड केलेली जमीन ग्रामस्थांस अडीअडचणीच्या वेळी विकता येईल का ?
   **होय**, सामंजस्य पत्रापलिकडे कोणतेही करारपत्र केले जाणार नसल्यामुळे संस्थेने लागवड करुन दिलेली जमीन त्या लागवडीसहीत ग्रामस्थास अडीअडचणीच्या वेळी विकता येईल. अश्याप्रकारे लागवडीसहीत जमीन विक्री करतेवेळी शक्यतो वाडीतील ग्रामस्थास प्राधान्य द्यावयाची अपेक्षा संस्थेकडून बाळगली जाईल. तसेच जमीन विक्री वाडीबाहेरील व्यक्तीस केल्यास संस्थेने लागवडीसाठी केलेल्या खर्चापैकी काही रक्कमेचा परतावा संस्थेस मिळावा अशी अपेक्षा संस्थेकडून बाळगली जाईल. खर्चाचा परतावा मिळावा ही संस्थेची फक्त अपेक्षा असून अश्याप्रकारची कोणतीही अट किंवा बंधने सामंजस्य पत्रात असणार नाही.

संस्थेकडून संस्थेच्या माध्यमातून वनीकरण योजना राबविण्याचा हा प्रस्ताव प्राथमिक स्वरुपात असून वरील प्रस्तावास ग्रामस्थांची अनुकुलता मिळाल्यास याबाबत पुढील कार्यक्रमाची आखणी तसेच कागपत्रांची पुर्वतयारी करण्यात येऊन एक सर्वसाधारण सभा किंवा स्नेहसंम्मेलन (डिसेंबर 2018 पर्यंत) भरवून याबाबत पुढील कार्यक्रम ठरविता येईल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्ताव क्रमांक 4

**वाडीतील घरांजवळ पडीक असलेल्या शेत जमीनीवर सामुहिक शेती धोरणाखाली अपरंपरागत परंतू विक्रमी उत्पादन व अर्थाजन मिळवून देणाऱ्या पिकांची, भाजीपाल्याची किंवा फळझाडांची लागवड करण्याबाबत विचार करणे**

वाडीतील फारच मोजके ग्रामस्थ सध्या भातशेती करतात, जे करतात त्यांनाही भातशेतीपासून स्वत:साठी वर्षभर पुरेल इतके उत्पन्न मिळत नाही आणि तांदळासारखी कोकणात मुबलक प्रमाणात पिकणारी वस्तुही बाजारातून विकत आणावी लागते. इतर पिके म्हणजे वरी, नाचणी, कुळीद, भुईमुग इत्यादि तर कधी काळी घेतली होती असे ऐकून माहीत आहे.

आपण या सर्व गोष्टी बाजारातून विकत आणतो. या गोष्टी बाजारात कोण विकायला आणतो याचा आपण कधी विचार करतो का ? कोणतरी शेतकरी या गोष्टी मुबलक प्रमाणात पिकवत असल्यामुळे आणि अतिरिक्त पिक अर्थाजनासाठी विकत असल्यामुळे या गोष्टी बाजारात विकावयास येतात.

एके काळी एकत्रित असलेली कुटुंबव्यवस्था विभागणी झाल्यामुळे विभक्त कुटुंबाच्या वाट्यास छोटे छोटे जमीनीचे तुकडे आले. आपल्या वाडीतील फार कमी जणांच्या वाट्यास एक एकराचा सलग्न शेतजमीनीचा तुकडा आलेला असेल. या तुकड्यातुकड्यातून शेती करावयास पारंपारिक शेतसाधणे, गुरेढोरे आणि मनुष्यबळ याची आवश्यकता भासते. विभक्त कुटुंबामुळे मनुष्यबळ कमी त्यातच गावी राहणारी माणसे कमी आणि तरुण औषधालाही सापडणार नाहीत असे असतांना मनुष्यबळ वापरून शेती करणे हा फक्त तोट्याचा व्यवसाय किंवा छंद होऊ शकेल. मनुष्यबळ योग्य प्रकारे न वापरले गेल्यामुळे रिकाम्या डोक्यात इतर छंद किंवा व्यसनाधिनता वाढीस लागत आहे. छंद किंवा व्यसने भागविण्यासाठी पैसा उभा करावा म्हणून चोरुन जंगलतोड, वाडवडींलार्जित जमीनी कवडी मोलाने विकने इत्यादि प्रकार होत आहेत. झाडे तोडून जमीनी विकल्यावर पुढे काय ? हा विचार या पिढीच्या मनात येत नाही. परंतू ही परिस्थिती नक्कीच कधी ना कधी येणार आणि जेव्हा केव्हा येईल त्यावेळी भविष्य भयाण स्थितीत आ वासून उभे असेल आणि परतीचा मार्गही कदाचित नसेल.

वाडीतील उपलब्ध युवाशक्तीस योग्य मार्ग द्यावा तसेच त्यास उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन द्यावे या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी सामुहिकरित्या शेती करण्याचा विचार काही काळापूर्वी मांडला होता. आपण सामुहिकरित्या शेती जरी केली नसली तरी ग्रामस्थांनी यापूर्वी आपली पडीक शेती कसु शकणाऱ्या दुसऱ्या ग्रामस्थांस खंडाने दिलेली आहे. खंडाने शेती कसावयास दिल्यामुळे निदान दरवर्षी जमीनीची भाजणी, पेरणी इत्यादि होऊन शेतजमीन वापरात राहून नापीक होण्याची भिती नव्हती. खंडाने जमीन दुसऱ्यास कसावयास देण्याची बाबही हळूहळू कमी झाली कारण कसणाऱ्याच्या नावावर सरकार जमीन करेल ही भीती. त्यामुळे ज्या ग्रामस्थाचे गावी कोणही नाही आणि फक्त गणेश चतुर्थी किंवा उन्हाळी सुट्टीच्या दरम्याण गावी जाणे होते त्यांची शेतजमीन पडीक राहू लागली.

पूर्वी गणेश चतुर्थीच्या काळात वाडीतील परीसरात भातशेती डौलत असे तेथे आता फक्त रान माजलेले असते आणि शेतीजमीनीपासून उत्पन्न मिळण्यापेक्षा रान काढण्यासाठी खर्च करावा लागतो. मे महिण्यात जिथे काही घरांजवळ पालेभाज्या उगविल्या जात असत तेथे आता फक्त ओसाड जमीन दिसते. थोडक्यात गणेश चतुर्थीच्या दरम्याण गावी जाणाऱ्या बहुतांशी मुंबईकरांस नैवेद्याच्या भाजीसाठी आणि मिरची कोथिंबीरीसाठीही कणकवलीस जावे लागते.

सध्याच्या काळात मनुष्यबळ अपुरे आणि खर्चिक असल्यामुळे तसेच त्याची उपलब्धता बेभरवश्याची असल्यामुळे यांत्रिक शेती म्हणजेच ट्रॅक्टर, टिलर इत्यादि यंत्रे वापरुन सुसह्यपणे शेती हा एक व्यवसाय म्हणून करता येईल. यांत्रिक शेतीस अडथळा म्हणजे वाडीतील ग्रामस्थांची जमीन छोट्या छोट्या तुकड्यात असल्यामुळे तेथे ट्रॅक्टर इत्यादी यंत्रे सहजपणे वापरता येत नाहीत आणि कुचकामी ठरतात. याकारणामुळे काही ग्रामस्थांस अशी यंत्रे विकत घेणे शक्य असुनही त्याचा वर्षभर वापर होणार नसल्यामुळे ते ती विकत घेण्याचा विचार करत नाहीत.

संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी मांडलेल्या विचारास अनुसरुन संस्थेमार्फत सामुहिक शेती करण्याचा प्रस्ताव चर्चेसाठी ग्रामस्थांपुढे मांडण्यात येत आहे. या प्रस्तावा अंर्तगत प्रथमत: वाडीच्या परीसरातील कमीतकमी 25 एकर जमीन लागवडीखाली आणावयाचा विचार असून ग्रामस्थांची अनुकुलता लाभल्यास याबाबत पुढील कार्यक्रम आखता येईल.

सामाईकरित्या शेती करण्यासाठी खालील बाबी सुरवातीस कराव्या लागतील –

1. वाडीच्या परिसरातील जमीनीची प्रथम मोजनी करुन घ्यावी लागेल जेणेकरुन जमीनीची मालकी, क्षेत्र आणि सीमा याबाबत स्पष्टता येईल.
2. जमीनीची मालकी, क्षेत्र आणि सीमा निश्चित झाल्यावर जमीनमालकास संस्थेबरोबर पुढील पाच ते सात वर्षांकरीता त्याची जमीन संस्थेस कसावयास (खंडास) देत आहे असे करारपत्र करावयास लागेल. आवश्यकता भासल्यास करारपत्र रजिस्टर करता येईल जेणेकरून जमीनमालकास आपली जमीन संस्था बळकावेल अशी भिती उरणार नाही. महत्वाचे म्हणजे संस्थेची मालकी कोणा एका व्यक्तीकडे नसल्यामुळे आणि संस्थेवरील पदाधिकाऱ्यांची निवड लोकशाही पध्दतीनुसार करण्यात येणार असल्यामुळे ग्रामस्थांची ही भीती निराधार आहे.
3. करारपत्रात जमीनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा कितवा हिस्सा जमीनमालकास मिळेल ही बाब स्पष्ट नमुद केलेली असेल. हा दिला जाणारा हिस्सा सध्या प्रचलीत खंडाला शेती देण्यामुळे मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा जास्त असेल.
4. शेती / भाजीपाला / फळझाडे लागवडीची सर्व जबाबदारी संस्थेमाफत नेमण्यात आलेल्या सब-कमिटीची असेल. कार्यकारीणीने नियुक्त केलेली कमिटी ट्रॅक्टर / टिलर इत्यादी खरेदी / भाडेतत्वावर मिळविणे, मनुष्यबळ मिळविणे व वापरणे याबाबत निर्णय घेईल.

ग्रामस्थाची या प्रस्तावास अनुकुलता मिळून आवश्यक असलेली किमान जमीन उपलब्ध झाल्यावर संस्था स्वखर्चाने सर्व जमीनींचे एकत्रिकरण / सपाटीकरण करुन घेईल. हे करताना जरी पारंपारीक मेरा नाहिश्या झाल्या तरी जमीनीची मोजनी केली गेली असल्यामुळे आणि मोजनीवेळी जमीनीच्या सीमा कळल्या असल्यामुळे जमीनींची सरमिसळ न होता जमीन मालकीबाबत स्पष्टता कायम असेल.

जमीनीचे सपाटीकरण झाल्यावर वाडीतील मनुष्यबळ (आवश्यकता भासल्यास बाहेरून मनुष्यबळ आणून) यांत्रिक साधने वापरुन शेती / पालेभाज्या / फुलझाडे यांची लागवड करता येईल.

सामुहिकरित्या करण्यात येणाऱ्या शेतीमधून मिळणारे उत्पन्न होणारा खर्च वजा करता ज्या ज्या ग्रामस्थाकडून जमीन करारपत्राव्दारे संस्थेस कसावयास मिळविण्यात आलेली आहे त्या ग्रामस्थाच्या क्षेत्राप्रमाणे लाभांश (खंड) स्वरुपात किंवा रोख रक्कमेच्या स्वरुपात दिला जाईल.

संस्थेच्या माध्यमातून सामुहिक शेती करण्याबाबतचा हा प्रस्ताव प्राथमिक स्वरुपात असल्यामुळे सभेत या प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल व ग्रामस्थांचे शंकानिरसण करण्यात येईल. या प्रस्तावास पुरेश्या ग्रामस्थांची अनुकुलता मिळाल्यास आणि ग्रामस्थांकडून कसावयास उपलब्ध केली जाणाऱ्या जमीनीचे एकत्रीकरण करण्याची शक्यता आढळल्यानंतरच याबाबत पुढील कार्यक्रम आखण्यात येईल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्ताव क्रमांक 5

## कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक असणाऱ्या ग्रामस्थांची नोंद घेऊन त्यांची निवड कार्यकारीणीवर करणे

गेल्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत कार्यकारीणी सदस्यांची संख्या 2 ने वाढवून 14 सदस्य करण्यात यावी असा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी कार्यकारीणीची संस्था 12 सदस्य असल्यामुळे 2 नवीन स्थानिक ग्रामस्थांना कार्यकारीणीवर काम करण्यास वाव मिळावा हा हेतु कार्यकारीणी सदस्य संख्या वाढविण्यामागे होता.

त्यानंतर स्थानिकांकडून दोन ऐवजी तीन नावे (सौ अनुजा अरुण राणे, श्री संकेत रत्नाकर राणे आणि श्री रामदास मारुती राणे) सुचविण्यात आल्यामुळे दोन ऐवजी या तीनही स्थानिक ग्रामस्थांना कार्यकारीणीवर घेण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे कार्यकारीणी सदस्य संख्या 15 झाली. तसेच त्यानंतर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनाही कार्यकारीणीवर घेण्याचे ठरविण्यात आल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांची संख्या वाढून 16 झाली.

वरील सर्व बाबी विचारात घेता कार्यकारीणी सदस्यांची संख्या आता 14 वरून वाढून 16 सदस्य झाली असली तरी यात ताबडतोब बदल न करता तात्पुरत्या काळासाठी कार्यकारीणी सदस्य संख्या 16 सदस्य ठेवण्यात यावी. कार्यकारीणी सदस्य संख्या पूर्वी एवढीच 12 सदस्यांपर्यंत सिमीत करण्यासाठी पुढील चार वर्षात म्हणजेच आर्थिक वर्ष 2019 -20 पासून प्रत्येक वर्षी 3 कार्यकारीणी सदस्य निवृत्त करून त्याऐवजी 2 नवीन कार्यकारीणी सदस्य निवडण्यात यावेत जेणेकरून चार वर्षानंतर कार्यकारीणी सदस्य संख्या 12 होईल. यापूर्वी ठरविल्यानुसार कार्यकारीणी कमीतकमी 25% सदस्य फक्त स्थानिक असावेत.

कार्यकारीणी सदस्य म्हणून उमेदवारी जाहीर केल्यावर तसेच निवड झाल्यावर निवड झालेल्या सदस्यांनी वर्षभरात किमान 10 दिवस ग्रामस्थांच्या हितासाठी द्यावेत अशी अपेक्षा ग्रामस्थांनी ठेवण्यास हरकत नाही. तसेच निवड झालेल्या कार्यकारीणी सदस्यांनी कमीतकमी 50% कार्यकारीणीच्या सभांस उपस्थित राहून चर्चासत्रात भाग घ्यावा अशी अपेक्षा इतर कार्यकारीणी सदस्यांनी ठेवणे वावगे ठरणार नाही. असे न झाल्यास संस्थेच्या कार्यकारीणीवर होणारी निवड फक्त खोगीर भरती ठरून कामाचा भार फक्त अध्यक्ष, सचिव व खजिनदार आणि काही जागरुक कार्यकारीणी सदस्य यांवरच येईल आणि या 16 सदस्यांच्या जंबो कार्यकारीणीस काहीच अर्थ उरणार नाही.

गेल्या वर्षभरात म्हणजेच 31 मार्च 2018 पर्यंत कार्यकारीणीने 5  सभा बोलविल्या होत्या. या सभांचे निमंत्रण मुंबईस्थित 13 कार्यकारीणी सदस्यांव्यतिरिक्त स्थानिक 3 सदस्य आणि 13 इतर ग्रामस्थ यांनाही पाठविण्यात आले होते. कार्यकारीणी सभा मुंबई येथे घेत असल्याकारणे स्थानिक सदस्यांनी या सभांस उपस्थित असणे अपेक्षित नाही. आपल्या माहीतीसाठी या सभांस असलेली कार्यकारीणी सदस्यांच्याआणि आमंत्रितांच्या उपस्थितीचा आढावा सोबत जोडला आहे.

कार्यकारीणीमधील काही सदस्य वृध्द झाल्यामुळे तसेच प्रकृती अस्वाथ्यामुळे कार्यकारीणीच्या सभांस उपस्थित राहू शकत नसल्यामुळे तसेच संस्थेच्या कामांस पुरेसा वेळ देऊ शकत नसल्यामुळे कार्यकारीणीवरुन पायउतार होण्यास तयार आहेत. परंतू त्यांच्या अनुभवाचा फायदा संस्थेस व ग्रामस्थांस व्हावा या विचाराने इतर कार्यकारीणी सदस्यांनी त्यांस कार्यकारीणीवर राहण्याची विनंती केली आहे. कार्यकारीणीवर काम करण्यास तरुण मंडळीस भरपूर वाव असून त्यांनी आपली उमेदवारी जाहीर करून कार्यकारीणीवर यावे अशी अपेक्षा संस्थेस आहे. स्वत:हून इच्छूक उमेदवार कार्यकारीणीवर काम करण्यास मिळाल्यास सध्याचे काही कार्यकारीणी सदस्य निवृत्ती स्विकारून मार्गदर्शकाची भुमिका बजावू शकतील.

### मंजूरीसाठी प्रस्ताव

1. कार्यकारीणी सदस्यांची संख्या 14 सदस्यांवरुन तात्पुरत्या काळासाठी 16 सदस्य करावी.

2. कार्यकारीणीवर येण्यास सभासदांने स्वत:हून उमेदवारी जाहीर केल्यानंतरच त्यांची निवड कार्यकारीणीवर करावी किंवा
3. कोणा सुचकाने एखाद्या सभासदाचे नाव कार्यकारीणी सदस्यासाठी सुचविल्यास त्या सभासदाने स्वत:हून कार्यकारीणीवर काम करण्याची संम्मती दर्शविल्यानंतरच त्याची निवड कार्यकारीणीवर करावी.
4. यावर्षी सभासदांनी / ग्रामस्थांनी कार्यकारीणीवर येण्यास उमेदवारी जाहीर केल्यानंतर त्यांस कार्यकारीणीवर काम करण्यास वाव मिळावा म्हणून कार्यकारीणीवर असलेल्या काही सदस्यांनी पायउतार होऊन यावर्षीची कार्यकारीणी सदस्यांची संख्या 16 पर्यंत मर्यादित ठेवावी. पायऊतार होणाऱ्या कार्यकारीणी सदस्यांबद्दल निर्णय कार्यकारीणी पुढील कार्यकारीणी सभेत घेईल.
5. यावर्षी तसेच यावर्षानंतर नवीन निवड झालेल्या कार्यकारीणी सदस्याचा कालावधी किमान 6 वर्षाचा राहील.
6. कार्यकारीणी सदस्यांची संख्या पुढील चार वर्षात 16 वरुन कमी करुन 12 सदस्यांवर आणावी.
7. कार्यकारीणी सदस्यांची संख्या 16 वरुन 12 सदस्यांवर आणण्यासाठी पुढील प्रत्येक वर्षी आर्थिक वर्ष 2019-20 पासून 3 कार्यकारीणी सदस्य निवृत्त करुन आणि त्यांचे जागी फक्त 2 कार्यकारीणी सदस्यांची निवड करावी. निवृत्त होणारे कार्यकारीणी सदस्य फेरनिवडीस पात्र असतील.
8. कार्यकारीणी सदस्य संख्या 12 झाल्यावर त्यानंतर पुढील दरवर्षी 2 सदस्य निवृत्त करण्यात यावेत.
9. पुढील चार वर्षात प्रत्येक वर्षी निवृत्त होणाऱ्या कार्यकारीणी सदस्यांची नावे सल्लामसलत करून ठरविण्याची परवानगी कार्यकारीणीस देण्यात यावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

# फळसेवाडी हितकारी संस्था

1 एप्रिल 2018 ते 31 मार्च 2024 या सहा वर्षाच्या कालावधीसाठी
फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणी सदस्यत्वाच्या निवडणूकीसाठी करावयाच्या उमेदवारीचा अर्ज

**उमेदवाराचे नाव** ------------------------------------------

**उमेदवाराचा पत्ता** ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

**सूचक सभासाचे नाव** ------------------------------------------

**सूचकाचा सभासदाचा पत्ता** ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

**अनुमोदक सभासाचे नाव** ------------------------------------------

**अनुमोदक सभासदाचा पत्ता** ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

अनुमोदकाची सही                    सूचकाची सही

दिनांक : __________

---

**उमेदवाराचे प्रतिज्ञाप्रत्र**

मी श्री / श्रीमती ___________________________________ असे जाहिर करतो / करते की, फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणी समितीचा सदस्य म्हणून माझी निवड झाल्यास मी ग्रामस्थांच्या हितासाठी संस्थेच्या कार्यकारीणी समितीचा एक सदस्य म्हणून काम करण्यास बांधील राहीन.

उमेदवाराची सही

दिनांक : __________

## आर्थिक वर्ष 2017 – 18 मध्ये घेण्यात आलेल्या कार्यकारीणी सभांमधील उपस्थितीचा अहवाल

| क्रमांक | नाव | 17-06-2017 | 12-08-2017 | 02-10-2017 | 04-11-2017 | 03-02-2018 | एकूण उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री मंगेश मनोहर राणे – अध्यक्ष | उ | उ | उ | उ | उ | 5 |
| 2 | श्री सुनिल सदानंद राणे – सचिव | उ | उ | उ | उ | उ | 5 |
| 3 | श्री उदय भगवान राणे – खजिनदार | उ | उ | | | उ | 3 |
| 4 | श्री दशरथ दत्ताराम साटम | उ | उ | उ | उ | उ | 5 |
| 5 | श्री पांडूरंग सावजी राणे | उ | उ | उ | | | 3 |
| 6 | श्री जयवंत नाना राणे | | उ | | | | 1 |
| 7 | श्री शंकर बाळकृष्ण राणे | उ | उ | | | | 2 |
| 8 | श्री रंजन रावजी म्हसकर | उ | उ | | | उ | 3 |
| 9 | श्री हेमंतकुमार रमेश राणे | | उ | | उ | | 2 |
| 10 | श्री दिलिप मधुकर राणे | | | | | | - |
| 11 | श्री अशोक दत्ताराम राणे | उ | उ | उ | | उ | 4 |
| 12 | श्री उत्तम वामन राणे | उ | | | | | 1 |
| 13 | श्री भरत गणपत राणे | | | उ | उ | उ | 3 |
| 14 | श्री संकेत रत्नाकर राणे – स्थानिक | | | | | | - |
| 15 | सौ अनुजा अरुण राणे – स्थानिक | | | | | | - |
| 16 | श्री रामदास मारुती राणे – स्थानिक | | | | | | - |
| | **आमंत्रित** | | | | | | |
| 1 | श्री गुरुनाथ गणपत राणे | उ | | उ | उ | उ | 4 |
| 2 | श्री विश्वास ज्ञानदेव राणे | उ | | | | | 1 |
| 3 | श्री सुनिल विनायक राणे | उ | उ | | उ | उ | 4 |
| 4 | श्री प्रविण मधुकर राणे | | | उ | उ | | 2 |
| 5 | श्री स्वप्निल जयवंत राणे | | | | | | - |
| 6 | श्री स्वप्निल पांडूरंग राणे | | | | | | - |
| 7 | श्रीमती तृप्ती अविनाश राणे | उ | | | | | 1 |
| 8 | श्री संतोष श्रीधर राणे | | | | | | - |
| 9 | श्री संदिप मोहन राणे | उ | | | | उ | 2 |
| 10 | श्री लवू शिवाजी राणे | उ | उ | उ | | | 3 |
| 11 | श्री गंगाराम महादेव राणे | | उ | | | | 1 |
| 12 | श्री संतोष मोहन राणे | | | | उ | | 1 |
| 13 | श्री रमाकांत बालशिवाजी राणे | | | | | उ | 1 |
| | | | | | | | |
| | कार्यकारीणी सदस्य उपस्थिती | 9 | 10 | 6 | 5 | 7 | |
| | आमंत्रित ग्रामस्थ उपस्थिती | 6 | 3 | 3 | 4 | 4 | |
| | एकूण उपस्थिती | 15 | 13 | 9 | 9 | 11 | |